


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा





परिवर्तन घडणार नगर बदलणार!

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) । काँग्रेस । शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मित्रपक्षांच्या महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार

| अ. क्रमांक | उमेदवाराचे नाव | फोटो | निशाणी |
| --- | --- | --- | --- |
| १ | अभिषेक बाळासाहेब कळमकर Abhishek Balasaheb Kalamkar | | |

आपली निशाणी तुतारी वाजविणारा माणूस

तुतारी वाजविणारा माणूस या चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड बहुमतांनी विजयी करा.

प्रकाशक : निलेश मालपाणी, अ.नगर शहर विधानसभा अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)





रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. ०७.११.२०२४ | अंक नं. २०८ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020






















# मागील १० वर्षात नगरकरांनी खूप भोगलंय, आता भोगू देणार नाही, सहन करणार नाही

## ही निवडणूक स्वार्थासाठी, घर भरण्यासाठी, कोणाला लुटण्यासाठी किंवा ताबा मारण्यासाठी नाही तर जनतेच्या सेवेसाठी : अभिषेक कळमकर

नगर – मागील दहा वर्षापासून आपण सर्वजण संघर्ष करत आहोत. मी निवडणुकीला उभा राहिलो ते काही स्वार्थासाठी नाही, घर भरण्यासाठी नाही, कोणाला लुटण्यासाठी नाही, कोणाला मारण्यासाठी नाही तर नगरकरांच्या सेवेसाठी ही निवडणूक लढवत आहे. जनतेने दहा वर्षात बरंच काही भोगलंय, पण आता मी आमदार झाल्यानंतर नगरकरांना भोगू देणार नाही, सहन करणार नाही, असा इशारा महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर यांनी दिला आहे.

नगर शहरातील माळीवाडा येथील विशाल गणपती मंदिरापासून महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर यांच्या प्रचार फेरीला खा. निलेश लंके यांच्या उपस्थितीत गुरुवारी (दि. ७) उत्साहात सुरुवात झाली. नगरच्या गजबजलेल्या रस्त्यांवरुन ही फेरी दिल्ली गेट येथील सभास्थळी पोहोचली, कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत एक सभा झाली. या कार्यक्रमात शहरातील विविध समाजातील लोकांनी आणि महाविकास आघाडीचे सर्व घटक पक्षांचे पदाधिकारी यांनी सहभाग घेतला.







महाविकास आघाडीचे उमदेवार अभिषेक कळमकर यांची खासदार निलेश लंके यांच्या उपस्थितीत शहरातून निघालेली प्रचार रॅली व रॅलीत सहभागी झालेले कार्यकर्ते. तर शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरात पूजा करून प्रचाराचा नारळ वाढवून शुभारंभ करण्यात आला. यावेळी आघाडीतील घटक पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना अभिषेक कळमकर म्हणाले की, हा निवडणूक लढा केवळ सत्ता मिळवण्यासाठी नसून, नगर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आहे. दहशतीच्या राजकारणाला आता आपण पूर्णविराम द्यायला हवा. प्रत्येक सामान्य माणसाच्या हक्कांची जपणूक करण्यासाठी आणि शहराच्या विकासासाठी आपण राजकारण करत आहोत. तुम्ही म्हणता, कुठं ताबा मारला तर त्यांना समोर आणा मी पुराव्यानिशी सांगतो की तुम्ही कुठे कुठे ताबा मारला आहे. गेल्या दहा वर्षात नगरमधील राजकारण संपून टाकण्यात आले आहे. राजकारण कसे करायचे असते हे खा. निलेश लंके यांनी दाखवून दिले आहे. राजकारण हे समाजसेवेचे, गोरगरीबांच्या कल्याणाचे, ज्येष्ठांच्या आशीर्वादांचे असते. पण राजकारणात खालच्या पातळीवर जाऊ नये. जनतेने ठरवले आहे २० तारखेला काय करायचे ते. जनतेनेच सांगितले आहे की तुम्ही फक्त प्रचार करत रहा. समोरच्यांची शोबाजी चालत राहील. जेसीबीने गुलाल उधळत राहतील. परंतु सर्वसामान्य जनतेने ही निवडणूक हातात घेतली आहे. त्यामुळे नगरमध्ये परिवर्तन अटळ आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

दहा वर्षांपासून रखडलेली विकास कामे करण्यासाठी संधी द्या आणि तुतारी चिन्हाला मतदान करा, असे नागरिकांना आवाहन केले. त्यांनी पुढे सांगितले की, या निवडणुकीत सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्याचा आमचा निर्धार आहे, त्यामुळे नागरिकांनी या लढ्यात महाविकास आघाडीला साथ द्यावी, असे आवाहन कळमकर यांनी केले आहे.

खासदार निलेश लंके यांनी सभेत उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, नगरच्या जनतेनेच आता हि निवडणूक हातात घेतली आहे. वास्तविक परिवर्तनाच्या दिशेने पाऊल उचलायचं असेल, तर अभिषेक कळमकर यांना विजयी करणे हा एकमेव पर्याय आहे. स्व. अनिल राठोड यांना श्रद्धांजली वाहायची असेल तर जनतेने महाविकास आघाडीच्या उमेदवाराला निवडून द्यावे, असे भावनिक आवाहन केले.

लंके यांनी नगरच्या विकासाचे आश्वासन देत पुढील दीड वर्षात आयटी पार्कच्या स्थापनेसाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले. जर पैशाच्या जोरावर निवडणुका जिंकल्या गेल्या असत्या तर आज अंबानी देशाचे पंतप्रधान झाले असते, पण नगरमध्ये हे राजकारण शक्य नाही, असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले. याचबरोबर नगरच्या सर्व समाज घटकांनी एकत्र येऊन अभिषेक कळमकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे त्यांनी आवाहन केले.

सभेत काँग्रेसचे किरण काळे, शिवसेनेचे विक्रम राठोड, संभाजी कदम, योगीराज गाडे, बाळासाहेब बोराटे, दिलीप सातपुते, दत्ता जाधव, दत्ता कावरे, शौकत तांबोळी, विशाल वालकर, फारुक रंगरेज, प्रदिप परदेशी, संग्राम कोतकर, स्मिता अष्टेकर, नलिनी गायकवाड, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नगर विधानसभा अध्यक्ष निलेश मालपाणी, अशोक बाबर, योगिराज गाडे, ओंकार सातपुते, संजय झिंजे, अशोक दहिफळे, संदीप दातरंगे, रावजी नांगरे आदी महाविकास आघाडीचे विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी एकमुखाने महाविकास आघाडीच्या उमेदवाराला विजयी करण्याचा निर्धार व्यक्त केला. नगरच्या सुसंस्कृततेचे दर्शन घडवणाऱ्या या सभेत अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडण्यात आले. विशेषतः सुरक्षितता, रोजगार, आणि नगरच्या नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होणारा उमेदवार निवडण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

# एसटी बस प्रवासात शेजारी बसलेल्या महिलेने चोरली दागिने व रोकड असलेली पर्स

नगर – नाशिक ते नगर एसटी बसने प्रवास करत असलेल्या महिलेची ३ तोळ्याचे मिनीगंठन व ३ हजारांची रोकड ठेवलेली पर्स शेजारी बसलेल्या एका अनोळखी महिलेने चोरल्याची घटना समोर आली आहे. त्या अनोळखी चोरट्या महिलेच्या विरोधात तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत दिपाली हरिभाऊ कपाळे (वय ४३, रा. शांतीनगर, नाशिक) यांनी बुधवारी (दि.६) दुपारी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे माहेर बालिकाश्रम रस्त्यावरील बागडे मळा येथे असल्याने त्या मंगळवारी (दि.५) सकाळी ८ वाजता मुलीसह नाशिक येथून नगरला येण्यासाठी नाशिक-अकलुज या एस टी बस मध्ये बसल्या. त्यानंतर एस टी बस ही राहूरी येथे सकाळी ११.४५ च्या सुमारास आली असता त्याठिकाणी काही प्रवासी बस मध्ये चढले त्यात तिन अनोळखी महिला होत्या. फिर्यादीच्या मुलीला उलटी होत असल्याने ती खिडकी जवळ उभी होती.

त्यानंतर बस नागापूर एम आय डी सी येथे आली असता त्यातील एक महिला फिर्यादी शेजारी येवून बसली. त्यानंतर एस टी बस ही दुपारी १२.३५ चे सुमारास सावेडी नाका येथे आली असता फिर्यादी व त्यांची मुलगी एस टी बस मधून उतरायला लागल्या. त्यावेळी त्यांचे पाठीमागे ती अनोळखी महिला तिचे सोबतचे इतर दोन महिला देखील एस टी मधून उतरल्या. त्यानंतर एस टी बस मधून उतरून फिर्यादीने त्यांच्या सर्व वस्तू पाहिल्या असता त्यांनी बसमध्ये बसलेले असताना मांडीवर ठेवलेली पैसे व त्यात दागिने असलेली पोपटी रंगाची छोटी पर्स दिसून आली नाही.

तेव्हा एस टी बस थांबलेलीच होती म्हणूनच त्यांनी लगेचच एस टी मध्ये जावून पाहिली असता पर्स तेथील सिटवर मिळून आली नाही. त्यांना थोडी शंका आल्याने त्यांनी अनोळखी महिलांकडे पाहिले असता त्या घाईगडबडीने पायी जावून बरेच अंतरावर गेलल्या दिसल्या. त्यानंतर त्यांना आवाज दिला असता त्या महिला रिक्षा मध्ये बसून निघून गेल्या. त्यामुळे सदर पर्स शेजारी बसलेल्या महिलेनेच चोरली असल्याचा संशय दिपाली कपाळे यांनी फिर्यादीत व्यक्त केला आहे. या फिर्यादी वरून त्या अनोळखी महिलेच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण, सेन्सेक्स ९०० अंकांनी कोसळला; गुंतवणूकदारांचे नुकसान

मुंबई – अमेरिकेतील निवडणुकीच्या रिंगणात डोनाल्ड ट्रम्प यांचा विजय निश्चित होऊन एक दिवसही उलटलेला नाही आणि भारतीय शेअर बाजारात ९०० हून अधिक अंकांची पडझड पाहायला मिळत आहे. आठवड्याच्या चौथ्या व्यवहाराच्या दिवशी देशांतर्गत शेअर बाजारात मोठी घसरण नोंदवली गेली असून यामुळे गुंतवणूकदारांना लाखो कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. अमेरिकेतील अध्यक्षपदाच्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांनी आघाडी घेतल्याने बुधवारी (दि.६) बाजारात सुसाट गतीने तेजीचे वारे वाहू लागले मात्र, गुरुवारी (दि.७) देशांतर्गत बाजाराने यू-टर्न घेतला. बीएसई सेन्सेक्स आणि निफ्टी निर्देशांकात सुरुवातीच्या व्यवहारात मोठी घसरण होत आहे.

बाजारातील या घसरणीत सेन्सेक्स ९०० पेक्षा जास्त अंकांनी कोसळला तर निफ्टी देखील १९० पेक्षा जास्त अंकांनी घसरला. अशा स्थितीत, आता ही घसरण ट्रम्प यांच्या विजयाशी संबंधित आहे की त्यापूर्वी सेन्सेक्स आणि निफ्टीची सद्यस्थिती जाणून घेऊया. गुरुवारी सुरुवातीच्या व्यवहारात देशांतर्गत शेअर बाजाराने घसरण नोंदवली गेली. जागतिक घडामोडी आणि परदेशी गुंतवणूकदारांची सततची माघार यामुळे बाजार घसरत असल्याचे बाजार विश्लेषकांनी सांगितले तर सध्या बीएसई सेन्सेक्स ८४२ अंकांनी घसरून ७९५३६.०६ अंकांवर आला.

यादरम्यान बीएसई एक्सचेंजमध्ये सूचिबद्ध बजाज फिनसर्व्ह, अल्ट्राटेक सिमेंट, पॉवर ग्रिड, आयसीआयसीआय बँक, बजाज फायनान्स, कोटक महिंद्रा बँक, अदानी पोर्ट्स आणि नेस्ले यांचे शेअर्स सर्वाधिक घसरले. त्याचवेळी, टाटा स्टीलचे शेअर्स एक टक्क्याहून अधिक वधारले तर एचसीएल टेक्नॉलॉजीज, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस आणि जेएसडब्ल्यू स्टीलचे शेअर्सही फायदेशीर ठरले.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## एक सर्वसामान्याचे आत्मचरित्र - पांथस्थ

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

प्रारब्ध कर्मानेच घडवायचे असते. बऱ्याच अंशी ते खरंय. संत तुकारामांच्या अभंगासम माझ्या आयुष्यात अनेक देवमाणसं भेटली. संतसज्जनांचा सहवास लाभला. गुरुकृपा लाभली. बालपणी सुसंस्कार घडले. शाळेत दर्जेदार गुरुजी व शिक्षण लाभले. पितृतुल्य अधिकारी व माणसं भेटली. चांगली मित्रमंडळी मिळाली.

मी एक सामान्य व्यक्ती. आत्मचरित्र लिहिण्याइतके मोठेपण माझ्यात नाही. पण माझा जीवनप्रवास अनेक सामान्य घटनांनी, प्रसंगांनी भरलेला आहे.

प्रयत्न, सचोटी, प्रामाणिकपणा यांच्या निकषातून मी ध्येयसिद्धी गाठली. माझ्या नोकरीतून सन्मानपूर्वक सेवानिवृत्त झालो. यातूनच आठवणीतले प्रसंग, घटना यांचा संगतवार आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

अनेक संकटे, चढउतार, बरेवाईट प्रसंग यांचा सामना करून हा जीवनप्रवास पुढे चालवायचा असतो. त्यातूनच माणसाच्या कसोटीची पारख होते.

आयुष्यात घडलेले प्रसंग सर्व काही आपल्याबरोबरच निघून जाते. त्यांच्या हृदयात दाटून राहिलेल्या आठवणी, या लिखित स्वरूपात चिरंतनपणे जीवित राहण्यास तसेच उपकारकर्त्या व स्नेही व्यक्तींबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी या उद्देशाने आत्मचरित्र लिहिण्याचा प्रपंच केला आहे.

(लेखक- विनायक जोशी)



प्रारब्धेची होय सुख । प्रारब्धेची होय दुःख ।
प्रारब्धेची भर पोट । तुका करिना बोभाट ।
भवसागर तरता । का रे करितसे चिंता ।
पैल उभा दाता । कर कटी ठेउनिया ।।

# तब्बल १६ वर्षानंतर ज्युनिअर बॉईज स्टेट चॅम्पियनशिपमध्ये जिल्ह्याच्या संघ उपांत्यपूर्व फेरीत; ८ नोव्हेंबर रोजी सामना



ज्युनिअर बॉईज स्टेट चॅम्पियनशिप स्पर्धेतील जिल्हा संघातील खेळाडू.

नगर - शिरपूर (जि.धुळे) येथे सुरु असलेल्या वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (महाराष्ट्र राज्य) आंतर-जिल्हा फुटबॉल स्पर्धेमध्ये अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या (अहिल्यानगर) संघाने उपांत्यपूर्व फेरीमध्ये प्रवेश केला आहे. स्पर्धेसाठी ४ नोव्हेंबरला जिल्ह्याचा संघ रवाना झाला होता.

स्पर्धेच्या उद्घाटनाच्या सामन्यात ५ नोव्हेंबर रोजी जिल्ह्याच्या संघाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या संघाचा ५-२ गोल फरकाने पराभव केला. या सामन्यात विजयी संघासाठी भानुदास चंद याने ३ गोल करून हॅट्रिकची नोंद केली. कर्णधार कृष्णराज टेमकर आणि इशांत अहुजा यांनी १-१ गोल नोंदवून संघाच्या विजयात महत्वपूर्ण योगदान दिले.

स्पर्धेच्या दुसऱ्या सामन्यात ६ नोव्हेंबर रोजी राज्यातील सर्वोत्कृष्ट संघांपैकी एक असलेल्या नाशिक जिल्ह्याच्या संघाबरोबरील सामन्यात सुरुवातीला २-० आणि मध्यंतरानंतर ३-१ गोलने पिछाडीवर असताना सामना संपण्यास अवघी काही मिनिटे शिल्लक असताना अहमदनगर संघाने २ गोलची पिछाडी भरून काढत सामना टाय ब्रेकर मध्ये नेला. निर्धारित वेळेत अहमदनगर संघासाठी भानुदास चंद याने २ गोल आणि अशोक चंद याने एका गोलची नोंद केली. टाय ब्रेकरमध्ये संघासाठी स्वराज आडेप, माहीर गुंदेचा, भानुदास चंद आणि कृष्णराज टेमकर यांनी गोल नोंदवले. कर्णधार कृष्णराज टेमकर याने बदली गोलरक्षकाची भूमिका निभावताना नाशिक संघाच्या २ पेनल्टी किक रोखून संघास विजयी केले. सामन्याअंती अहमदनगर संघाने नाशिक संघाचा टायब्रेकरमध्ये ४-३ असा पराभव करून स्पर्धेच्या पुढील फेरीत प्रवेश केला.

७ नोव्हेंबर रोजी स्पर्धेच्या उप-उपांत्यपूर्व फेरीमध्ये अहमदनगर जिल्ह्याच्या संघाने सोलापूर जिल्हा संघाचा ५-० गोल फरकाने एकतर्फी पराभव करून स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. विजयी संघासाठी भानुदास चंद याने स्पर्धेतील दुसऱ्या हॅट्रीकची नोंद करताना ३ गोल आणि कर्णधार कृष्णराज टेमकर याने २ गोल मारून संघास विजयी केले.

संघाचा पुढील सामना नागपूर जिल्हा संघाबरोबर ८ नोव्हेंबर रोजी होणार आहे. तब्बल १६ वर्षानंतर ज्युनिअर बॉईज स्टेट चॅम्पियनशिप (१५ वर्षांखालील) या कॅटेगरीमध्ये जिल्ह्याच्या संघाने उपांत्यपूर्व फेरीत (टॉप ८) मजल मारली आहे. स्पर्धेपूर्वी १५ दिवस निवड चाचणी व प्रशिक्षण शिबीर आणि संघाला प्रत्यक्ष सामने खेळण्याचा अनुभव मिळावा म्हणून शहरातील विविध क्लबसच्या वरिष्ठ संघांबरोबर मैत्रीपूर्ण सामन्यांचे आयोजन करण्यासाठी अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटनेचे सचिव रोनप फर्नांडिस यांनी अथक परिश्रम घेतले.

जिल्हा संघाचे निवड समिती सदस्य व्हिक्टर जोसेफ, राजेंद्र पाटोळे व संघाचे प्रशिक्षक झेविअर स्वामी व सह-प्रशिक्षक वैभव मनोदिया यांनी उत्तम कामगिरी बजावली आहे. संघाच्या या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालिद सय्यद, जोगासिंह मिन्हास, सहसचिव प्रदीप जाधव, खजिनदार रिशपालसिंह परमार, सहखजिनदार रणबीरसिंह परमार आणि सर्व सहभागी खेळाडूंचे पालक यांनी संघाचे अभिनंदन करून पुढील सामन्यांसाठी शुभेच्छा दिल्या.



आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते शहर बस सेवेतील गाड्यांवर पोस्टर लावून त्याचे अनावरण करण्यात आले.

# लोकशाही बळकट करण्यासाठी जनतेने शंभर टक्के मतदान करावे

### आयुक्त यशवंत डांगे यांचे आवाहन; महापालिकेच्या शहर बस सेवेतील गाड्यांवर पोस्टरद्वारे जनजागृती

नगर - विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहरात महानगरपालिकेच्या वतीने मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. या अंतर्गत महानगरपालिकेच्या शहर बस सेवेतील सर्व बस गाड्यांवर पोस्टर लावून जनजागृती करण्यात आली. शहरात मोठ्या प्रमाणात नागरिक शहर बस सेवेचा लाभ घेतात. शहराच्या सर्व भागात बसेसच्या माध्यमातून सेवा दिली जाते. त्यामुळे या बसेसवर पोस्टर लावून नागरिकांमध्ये जनजागृती केली जात आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी अहिल्यानगर शहरातील मतदारांनी १०० टक्के मतदान करावे, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते शहर बस सेवेतील गाड्यांवर पोस्टर लावून त्याचे अनावरण करण्यात आले. शहरातील बस स्टॉप, कचरा संकलन करणाऱ्या घंटागाड्या आदींवर फलक लावून, जिंगल्स वाजवून मतदारांमध्ये जनजागृती केली जात आहे. मतदारांकडून संकल्पपत्र भरून घेतले जात आहेत. महापालिकेतील देयके, विविध पावत्यांवर वॉटरमार्कद्वारे मतदार जागृतीचा लोगो छापण्यात आला आहे. सोशल मीडियात अधिकाऱ्यांमार्फत मतदारांना मतदानासाठी आवाहन केले जात आहे. शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम, कार्यक्रमांच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. विविध मॉर्निंग ग्रुपमध्ये चर्चासत्र घडवून आणत वेगळ्या प्रकारे जनजागृती केली जात असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी यावेळी सांगितले.

## स्नेहालय संस्थेत ९ नोव्हेंबरला रंगणार 'माजी विद्यार्थ्यांच्या गप्पागोष्टी'

नगर - स्नेहालय सामाजिक विश्वस्त संस्थेतर्फे अनाथ, एक पालक व काळजी व संरक्षणाची गरज असणाऱ्या मुलांचे संगोपन, शिक्षण, व पुनर्वसन हे काम मागील ३० वर्षापासून केले जाते. स्नेहालय संस्थेतून या सर्व सेवांचा लाभ घेऊन १८ वर्षे पूर्ण झालेली साधारणपणे ७२३ मुले बाहेर आहेत. या सर्व मुलांपैकी काही इंजिनियर, अकाउंटंट, शिक्षक, या सर्व पदावर काही मुले काम करतात. या सर्व माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा स्नेहालय संस्थेच्या स्नेहबंध प्रकल्पाने आयोजित केला आहे. हा मेळावा स्नेहालय संस्थेच्या एमआयडीसी येथील रवींद्रनाथ टागोर सभागृहात ९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ७ या वेळेत होणार आहे. या मेळाव्यात मुलांबरोबर गप्पा गोष्टी, त्यांचे मनोरंजनात्मक खेळ, सर्व माजी विद्यार्थ्यांना मान्यवरांचे मार्गदर्शन, दिवाळीचे कीट व फराळ वाटप, फटाक्यांची आतिषबाजी हे सर्व कार्यक्रम होणार असल्याची माहिती प्रकल्पाचे संचालक मिलिंद कुलकर्णी यांनी दिली.

## नगरमध्ये ९ नोव्हेंबरला राज्यस्तरीय ख्रिस्ती वधु-वर परिचय मेळावा

नगर - उपदेशक यांच्यावतीने ९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते ५ या वेळेत क्लेरा ब्रुस हायस्कुल, प्रार्थना हॉल, कोठी, अहिल्यानगर या ठिकाणी राज्यस्तरीय सर्व पंथीय ख्रिस्ती वधू-वर पालक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून मेळाव्यास महाराष्ट्रातून सर्व पंथीय ख्रिस्ती वधू-वर उपस्थित राहणार आहे.

ज्या वधुवरांना मेळाव्याकरिता नाव नोंदवायचे असेल त्यांनी खालील दूरध्वनी क्रमांकावर मो. ८००७८३६१७४ / ८१४९२६०६९२ / ७४४८२७०६४५ यावर संपर्क साधावा. मेळावा ९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते ५ या वेळेत होणार आहे.

तरी जास्तीत जास्त ख्रिस्ती विवाह इच्छुक अविवाहित, विधवा, विधूर, घटस्फोटित, कमी शिक्षित, उच्चशिक्षित, पदवीधर, अपंग, वधू-वरांनी याचा लाभ घ्यावा.

## पंढरीनाथ पाटिलबा शिंदे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - पारगाव भातोडी येथील पंढरीनाथ पाटिलबा शिंदे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते १०३ वर्षांचे होते. ते अतिशय धार्मिक प्रवृत्तीचे होते. त्यांनी आपल्या तरुणपणात अनेक नाटकामध्ये अभिनय देखील केला होता. ते उत्तम कुस्तीपटू होते.



त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातू, पणतू, खापर पणतू असा परिवार आहे. निवृत्त भूमी अभिलेख अधिकारी किसन शिंदे, निवृत्त मुख्याध्यापक चंद्रकांत शिंदे, निवृत्त शिक्षक सूर्यकांत शिंदे यांचे ते वडील होत.

## लिलाबाई मुथा यांचे निधन

नगर - येथील लिलाबाई रतीलाल मुथा (वय ८२) यांचे ७ नोव्हेंबर रोजी पहाटे चारच्या सुमारास निधन झाले. त्या कापड व्यापारी सुशिल व आनंद मुथा यांच्या मातोश्री, रमेशलाल, ईश्वरलाल सतीश मुथा यांच्या त्या वहिनी होत्या.



त्यांच्या पश्चात दोन मुले, एक विवाहित मुलगी बेबीताई गांधी, सूना, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. त्या अतिशय धार्मिक वृत्तीच्या व मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या. त्यांच्यावर दुपारी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## विजय बोज्ञा यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर - येथील विजय बोज्ञा (वय ५०) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर होते.



त्यांच्या मागे पत्नी, तीन भाऊ एक बहीण, पुतणे भाचे असा परिवार आहे.

श्रीनिवास बोज्ञा यांचे छोटे बंधू होत. अंत्यविधी दु. १ ते १.३० च्या दरम्यान अहिल्यानगर येथील अमरधाम मध्ये होणार आहे

## सौ.ताराबाई दिवेकर यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील सौ. ताराबाई सुभाष दिवेकर (वय ६०) यांचे अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात आई, पती, एक मुलगा, दोन मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सुभाष ठकाजी दिवेकर यांच्या पत्नी, गणेश दिवेकर यांच्या मातोश्री होत

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# नगर जवळ दोन अपघातात दोघांचा मृत्यू

नगर - दोन वेगवेगळ्या अपघातात दोघांचा मृत्यू झाल्याची घटना एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत घडली आहे. या प्रकरणी २ स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नगर- छत्रपती संभाजीनगर महामार्गावर जेऊर (ता. नगर) शिवारात एक तर पांगरमल (ता. नगर) बस स्थानकावर दुसरा अपघात झाला आहे.

अक्षय बाबासाहेब सुसे (वय २८, रा. अमरापूर ता. शेवगाव) हा त्याच्याकडील दुचाकीवरून (क्र.एमएच १६ बीआर १२४३) पांढरीपुलाकडे जाणाऱ्या रस्त्याने पुलवाडी, वांबोरी (ता. राहुरी) येथे जात असताना पांगरमल बस स्थानकावर पांढरीपुलाकडून येणाऱ्या टेम्पोने दुचाकीला धडक दिली. या धडकेत अक्षय सुसे यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी टेम्पो चालक सुनील जालव दुड्डु (रा. झारखंड) याच्याविरूद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ज्ञानदेव नामदेव सुसे (वय ५५ रा. अमरापूर) यांनी फिर्याद दिली आहे. शनिवारी (२ नोव्हेंबर) सकाळी दहाच्या सुमारास ही घटना घडली.

नगर- छत्रपती संभाजीनगर महामार्गावर जेऊर टोलनाक्याच्या पुढे अंदाजे २०० मीटर अंतरावर झालेल्या अपघातात राजेंद्र तात्याबा गवांदे (वय ४५ रा. शेंडी ता. नगर) यांचा मृत्यू झाला.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मंगळवारी (दि.५) सकाळी दहाच्या सुमारास ही घटना घडली. अधिक तपास पोलीस अमलदार दुधाळ करत आहेत.

# विदेशी दारुची अवैध वाहतूक करणारा टेम्पो पकडला



विदेशी दारुची अवैध वाहतुक करणारा टेम्पो पकडल्यानंतर आरोपी समवेत भिंगार कॅम्प पोलिसांचे पथक.

### कोठला परिसरात भिंगार कॅम्प पोलिसांची कारवाई

नगर - मालवाहु आयशर टॅम्पोतुन विदेशी दारुची विनापरवाना वाहतूक करणाऱ्याला भिंगार कॅम्प पोलिसांनी कोठला बसस्थानक परिसरात नगर ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर पकडले आहे. त्याच्या ताब्यातून विदेशी दारूचे बॉक्स आणि टेम्पो असा ६ लाख ६४ हजार ६४० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दत्तात्रय भाऊसाहेब गायकवाड (रा. वडुले बुद्रुक, ता. शेवगांव) असे या आरोपीचे नाव आहे.

कॅम्प पोलीस स्टेशनचे स.पो.नि.जगदिश मुलगीर यांना बुधवारी (दि.६) रात्री गोपनीय माहिती मिळाली की, कोठला ते छत्रपती संभाजीनगर रोडने एका मालवाहु आयशर टॅम्पोतुन विदेशी दारुची विनापरवाना वाहतुक करत आहे, आता गेल्यास मिळून येईल अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याने स.पो.नि.मुलगीर यांनी तपास पथकातील अंमलदार यांना खात्री करुन कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. पोलिस पथकाने मध्यरात्री १२ च्या सुमारास कोठला बसस्थानक परिसरात सापळा लावला. थोड्याच वेळात त्यांना तेथून एक पांढऱ्या रंगाचा आयशर कंपनीचा मालवाहु टेम्पो (क्र. एमएच १६ सी सी ८६०४) छत्रपती संभाजीनगर कडे जात असताना दिसला.

त्यास थांबवून टेम्पो मिलिटरी मस्जीद जवळ रोडचे बाजुला घेऊन गाडी चालकास गाडीतील मालाबाबत विचारले असता त्याने उडवा उडवीचे उत्तरे दिली. त्यामुळे पथकाने सदर गाडीतील मालाची तपासणी केली असता ट्रान्सपोर्टच्या मालाच्या खाली लपवून ठेवलेले विविध कंपनीचे विदेशी दारुचे बॉक्स आढळून आले. ते बॉक्स व आयशर टॅम्पो असा ६ लाख ६४ हजार ६४० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करुन दत्तात्रय गायकवाड याच्या विरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन येथे दारुबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

ही कारवाई स.पो.नि.जगदिश मुलगीर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरिक्षक योगेश शिंदे, चंद्रकांत माळोदे, पोलीस हेडकॉन्स्टेबल दिपक शिंदे, रवि टकले, संदिप घोडके, व पो.कॉ. समीर शेख, प्रमोद लहारे, अमोल आव्हाड यांनी केली आहे.

# गावठी कट्ट्याने डोक्यात गोळीबार करत मित्राचा केला खून

### मृतदेह प्रवरासंगम येथे नदीत फेकला; तिघांच्या पोलिसांनी आवळल्या मुसक्या



गावठी कट्ट्याने डोक्यात गोळीबार करत मित्राचा खुन करून मृतदेह नदीत फेकणाऱ्या तिघांना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर - दारू पिताना भांडण झाल्यानंतर रागाच्या भरात मित्राच्या डोक्यात गावठी कट्ट्याने गोळी मारून त्याचा खुन केला. पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह पोत्यात घालून नेवासा तालुक्यातील प्रवरासंगम येथे नदीत फेकला. मात्र या खुनाचा गुन्हा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने उघडकीस आणला असून तिघांना बेड्या ठोकल्या आहेत.

पंकज राजेंद्र मगर (वय ३५, रा.माधवनगर, तिसगाव, ता.पाथर्डी), इरशाद जब्बार शेख (वय ३८, रा.सोमठाणे रोड, तिसगाव, ता.पाथर्डी), अमोल गोरक्ष गारूडकर (वय ३३, रा.तिसगाव, ता.पाथर्डी) अशी आरोपींची नावे असून त्यांनी कल्याण देविदास मरकड (रा.तिसगाव, ता.पाथर्डी) याचा खुन केलेला आहे. प्रवरासंगम येथे सोमवारी (दि.४) एका अनोळखी पुरूषाचा मृतदेह मिळून आला.मृतदेहाचे फोटो सोशल मिडीयावर प्रसारीत करून मृतदेहाची ओळख पटविली असता सदरचा मृतदेह हा कल्याण मरकड याचा असल्याचे निष्पन्न झाले. मयत हा दि.नोव्हेंबर पासुन बेपत्ता असल्याने त्याबाबत पाथर्डी पोलीस स्टेशन येथे मिसींगची तक्रार नोंदविण्यात आलेली होती.

मृतदेहाची ओळख पटल्यावर मयताचा भाऊ प्रसाद भास्कर मरकड (रा.तिसगाव) याने मंगळवारी (दि.५) नेवासा पोलिस ठाण्यात फिर्याद देत मयत कल्याण मरकड हा १ नोव्हेंबरला पंकज मगर, इरशाद शेख यांना भेटण्यासाठी गेला होता. त्यामुळे त्यांच्यावर संशय व्यक्त केला.

या गुन्ह्याचा समांतर तपास करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश आहेर यांनी उपनिरीक्षक तुषार धाकराव व पोलीस अंमलदार सुरेश माळी, संदीप पवार, संतोष लोढे, शरद बुधवंत, संतोष खैरे, विशाल तनपुरे, प्रशांत राठोड, मेघराज कोल्हे, अर्जुन बडे, अरूण मोरे यांचे पथक नियुक्त करत रवाना केले. सदर पथक तपास करत असताना बुधवारी (दि.६) पथकाला माहिती मिळाली की पंकज मगर, इरशाद शेख हे निवडुंगे शिवारात आहेत. या पथकाने तात्काळ तेथे जावून या दोघांसह अमोल गारूडकर यालाही पकडले. त्यांच्या कडे कसून चौकशी केल्यावर त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

सदर आरोपी व मयत कल्याण मरकड हे दि. १ नोव्हेंबर रोजी रात्री ११ वाजता तिसगाव मधील मिरी रोडच्या भारत पेट्रोलपंपाच्या मागील बाजुस मोकळया जागेत दारू पित असताना मयत व पंकज मगर यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाले.वादाचे रूपांतर हाणामारीत होऊन पंकज मगर याने त्याचेकडील गावठी कट्ट्याने कल्याण मरकड याचे कपाळावर गोळी मारली त्यात तो मयत झाला असल्याचे सांगीतले. त्यानंतर आरोपींनी मृतदेह, चप्पल व मोबाईल पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने एका गोणीत भरून चारचाकी वाहनातुन प्रवरासंगम येथील ब्रीजवरून खाली पाण्यात टाकुन दिला. तसेच आरोपी पंकज मगर याने गुन्हयात वापरलेला गावठी कट्टा हा त्याला सचिन रणसिंग (रा.दत्ताचे शिंगवे ता.पाथर्डी) याने दिला असल्याची माहिती सांगीतली आहे. ताब्यातील आरोपीस गुन्ह्याचे तपासकामी नेवासा पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### तुळशीच्या चहाचा लाभ

तुळस घालून नियमित चहा घेतल्याने किडनी स्टोनच्या आजारापासून आराम पडतो. तसेच तुळशीच्या पानांचा रस प्यायल्याने खडा लघवीवाटे बाहेर पडण्यास मदत होते. नियमीत तुळशीचा चहा पिल्याने घसा मोकळा होतो व घशातील जळजळीपासून आराम मिळतो.

## पाककला

### क्रिमी मँगो

**साहित्य** – गोडसर ताजा आंबा रस अर्धी वाटी, दूध अर्धी वाटी, फेसलेले क्रीम अर्धी वाटी, थोड्या आंबा फोडी व आईसिंग शुगर, दोन मोठे चमचे.

**कृती** – आंबा रस दूध एकत्रित मिसळून फेस येईपर्यंत चांगले घुसळून घ्या. फेसलेल्या क्रीममध्ये साखर टाकून फेसून एकजीव करा व आंबा रसात घाला. ढवळा. सर्व्ह करताना ग्लासात ओतून त्यात थोड्या आंबा फोडी टाका.

## वास्तू

### स्वयंपाकघरासंबंधी

* मुलांनी डायनिंग टेबलवर अभ्यास करणे अत्यंत अशुभ होय.
* स्वयंपाकघर आग्नेय कोपऱ्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही दिशेस बांधलेले असल्यास कुटुंबातील महिला कायम मानसिक तणावाखाली राहतात.

## सौंदर्य

त्वचा उलू नये म्हणून साजूक तूप अगर लोणी लावावे, मध लावावा, निरशा दुधावरील फेस लावणे फायदेशीर ठरते.

## सल्ला

फ्लॉवर वाळवायचा असेल, तर त्याची फुले तोडून माळेत ओवून उन्हात वाळवावीत.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. ८ नोव्हेंबर २०२४

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, उ.षा. १२।०३, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०६ वा. ३३ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : विवाहाची बोलणी करण्याच्या दृष्टीने विवाहोत्सुकांना यश मिळेल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**वृषभ** : दुपारनंतर तब्येत बिघडू शकते. गुंतवणूक विचारपूर्वक करा. जुने मित्र–मैत्रिणी भेटतील. वाहने व उपकरणे जपून चालवा. कीर्ती वाढेल. व्यापारात लाभ होईल.

**मिथुन** : इतरांच्या भानगडीत पडल्यामुळे अडचणीत याल. वाहन चालवताना अपघात होईल. उपकरणे जपून न वापरल्याने बिघडतील. मातृ–पितृचिंता सतावेल.

**कर्क** : व्यवसायात अनुकूल स्थिती. आपल्या कामाचे योग्य कौतुक होईल. समाजात मान–प्रतिष्ठा वाढेल. संततीसुख लाभेल. दिवस आनंदात जाईल.

**सिंह** : कामे सरळ पार पडतील आणि त्यांच्यापासून लाभ होईल. दांपत्य जीवनात आनंद दरवळेल.

**कन्या** : नवीन कार्याच्या आयोजनासाठी चांगला काळ. सामाजिक आणि आर्थिक लाभ होण्याचे योग आहेत.

**तूळ** : एखाद्या मनोरम्य स्थळी जाण्यासाठी सहलीचे आयोजन कराल. कुटुंबात विरोध होईल.

**वृश्चिक** : आनंददायक वस्तू खरेदी करण्यासाठी अधिक खर्च होईल. पितृचिंता सतावेल.

**धनु** : मानसिकस्वास्थ्य पण चांगले असेल दुपारनंतर शारीरिक व मानसिकदृष्ट्या अनुकूलता जाणवेल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**मकर** : परिवारात सुख शांती नांदेल. संततीविषयक काळजी राहील. कार्यालयीन सहकारी मदतीला धावून येतील.

**कुंभ** : अनैतिक आणि निषेधार्ह विचारांपासून दूर राहिल्याने काळ अनुकूल आहे. छोटेसे अपघात किंवा जळणे, पोळणे अशा दुर्घटना होण्याची संभावना आहे.

**मीन** : कुटुंबात भांडण झाल्याने शारीरिक व मानसिक अस्वास्थ्य सतावेल. दुपारनंतर परदेशातून वार्ता येतील. वाहने चोरीला जाण्याची शक्यता आहे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

मास्तर : सांगा, पाण्यापेक्षा हलके काय आहे.??
गण्या : सर..भजी.
मास्तर : कसे काय?
गण्या : सर, तेल पाण्यावर तरंगते आणि भजी तेलावर...

नर्स – पुढारी महाशय! तुम्हाला तिळं झालं.
पुढारी – काय?
नर्स – तुम्हाला तीन मुलं झाली आहेत.
पुढारी – मी फेरमोजणीची मागणी करीत आहे.

# ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* कोकणात कोणती वने आढळतात? – उष्णकटीबंधीय
* महाराष्ट्रात नागपूर जिल्ह्यात फन्हान येथे व भंडारा जिल्ह्यात तुमसर येथे कोणता धातू शुद्ध करण्याचे कारखाने आहेत? – मँगनीज
* ग्रामसभेचे सदस्य होण्यासाठी किमान वय किती? – १८
* भारताचे पितामह कोणास म्हणतात? – दादाभाई नौरोजी

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# फिल्मीचक्कर क्र. ११६२

सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) +++ + ++ ++ बोलो खुदा के पास जाना है (गाणे) ४) अमिताभ बच्चन, हेमामालिनी, अमजदखान, प्राण यांचा एक चित्रपट ७) ++ मेरे सपने (चित्रपटाचे नाव) ८) शशी कपूर, राखी, रेखा, राजकिरण, पूनम थिल्लन यांचा एक चित्रपट १०) या मराठी चित्रपटात डॉ. श्रीराम लागू आणि निळू फुले यांची जुगलबंदी आहे ११) राज बब्बर, सलमा आगा, दीपक पाराशर यांचा एक चित्रपट १४) ++ आज और कल (चित्रपटाचे नाव) १६) राजकुमार, धर्मेंद्र, शत्रुघ्न सिन्हा, डिंपल कापडिया, राज बब्बर, अनिता राज यात आहेत

**उभे शब्द :-** १) नवीन निश्चल, राखी यांचा एक चित्रपट २) 'सावन भादो' चित्रपटातून पदार्पण केलेली नायिका ३) राजकुमार, गोविंदा, फराह, ओम पुरी, कुलभूषण खरबंदा, शक्ती कपूर यात आहेत ५) ++ क्यों अरौ कहाँ (चित्रपटाचे नाव) ६) ++ गांव मेरा देश (चित्रपटाचे नाव) ९) एक दिवंगत चरित्र अभिनेता – असित ++ १२) नमक +++ (चित्रपटाचे नाव) १३) 'एक दूजे के लिए' चित्रपटातील एक सहनायिका १५) प्रसिद्ध गायिका – ++ मंगेशकर

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : अत्यंत पराक्रमी मनुष्य अत्यंत क्षमाशील आणि भांडणापासून दूर राहणारा असतो. – **थॅकरे.**

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## लहान मुलांना गुदद्वाराच्या जागी खाज का येते?

खूप वेळा लहान मुले संडासच्या जागी (गुदद्वाराजवळ) खाजवताना दिसतात. विशेषतः संध्याकाळ व रात्रीच्या वेळी ही बाब प्रकर्षाने जाणवते. खाज येण्याच्या अनेक कारणांत खरूज, त्वचादाह, ॲलर्जी इत्यादींचा समावेश होत असला; तरी अशी खाज फक्त गुदद्वाराजवळ न येता शरीरात अनेक ठिकाणी येते.

तंतूकृमी किंवा एन्टेरोबियस व्हर्मीक्यूलॅरिस नावाच्या जंताची लागण झाली की, या जागेवर खाज येणे हे लक्षण दिसून येते. सोबतच चिडचिड करणे, झोप न येणे, अंथरुणात नकळत लघवी होणे ही लक्षणेही दिसून येतात. वारंवार खाजवल्यामुळे रक्त येते, जंतुसंसर्ग होऊन कधी कधी पू सुद्धा येतो. भारतात अनेक जणांना हा रोग असतो. या जंताची मादी एक सेंमी लांब असते. नर मात्र ०.३ सेंमी इतका लांब असतो. हे जंत पचनसंस्थेतील लहान आतडे, आंत्रपुच्छ, मोठे आतडे यांच्या आवरणाला चिकटून असे राहतात. फलन झाल्यावर रात्रीच्या वेळेस मादी गुदद्वाराबाहेर येऊन सुमारे १०,००० अंडी घालते व मरण पावते. स्त्रियांमध्ये क्वचित ही जंताची मादी गुदद्वारातून बाहेर येऊन योनीमार्गात जाते व गर्भाशयातून पोटाच्या आतील आवरणात जाऊ शकते.

मादीच्या गुदद्वाराबाहेर येण्यामुळे, अंडी घालण्यामुळे गुदद्वारापाशी खाज येते. ही अंडी अस्वच्छपणामुळे व खाजवल्यामुळे नखाच्या घाणीतून परत तोंडात जातात. लहान आतड्यात गेल्यानंतर त्यातून अळी बाहेर येते. महिन्याभरात त्याचे प्रौढ जंत तयार होऊन पुन्हा हे चक्र सुरू राहते. या जंतांसाठी पिरँटील पामोएट वा मेबेंडॅझोल हे औषध प्रभावी ठरते. वैयक्तिक स्वच्छता नीट राखल्यास या जंताची लागण होणार नाही. नखे कापणे, शौचाला जाऊन आल्यानंतर तसेच जेवणापूर्वी हात साबण लावून पाण्याने स्वच्छ धुणे, एकमेकांचे कपडे न घालणे; या सोप्या गोष्टींमुळे या जंतांची लागण आपल्याला टाळता येते.

## बोका आणि उंदीर

एका बिळात एक उंदीर राहत असतो तो एकदा आजारी पडला. दिवसभर तो बिळातच पडून राहू लागला. बरेच दिवस झाले उंदीर बाहेर आला नाही, हे पाहून बोकोबा त्याची विचारपूस करण्यासाठी त्याच्याकडे आला आणि बिळाबाहेर बसत खोटा कळवळा दाखवीत मानभावीपणे म्हणाला, ''काय उंदरोबा, आजारी पडला की काय? आता कशी आहे तुझी प्रकृती? बाबा, काय औषधपाणी लागलं. सवरलं, तर मला सांग. मी लागतील ती औषधं तुला आणून देईन. शेजाऱ्याने शेजाऱ्याच्या उपयोगी पडणे, हाच खरा शेजारधर्म. संकटकाळात, आजारपणात एकमेकांना साहाय्य करणं, यासारखा सद्गुण शोधून सापडणार नाही.

''तेंव्हा उंदरोबा, जरा बाहेर या, म्हणजे तुमची प्रकृती कशी आहे, हे मला समजेल. म्हणजे मी वैदुबुवांना तुमच्या प्रकृतीचे वर्णन करून सांगताच ते तुमच्या आजारावर रामबाण औषध देतील. ते घेताच तुम्ही खडखडीत बरे होऊन उड्या मारू लागाल.''

बोकोबाचे हे संभाषण उंदीर आत बसूनच ऐकत होता. तो बाहेर न येता आतूनच म्हणाला, ''वा मित्रा, शेजारी असावा तर तुझ्यासारखा! किती कळवळ्याने बोललास! मित्रा, शेजारधर्माला जागून माझी जी विचारपूस केलीस, त्याबद्दल मी आभारी आहे. पण आता इथून एकदाचा निघून गेलास, म्हणजे मी लवकर बरा होईन आणि हो, पुन्हा इकडे येण्याची तसदी घेऊ नकोस.''

**तात्पर्य** : कारण नसताना एकाएकी जेव्हा आपले शत्रू आपल्याविषयी प्रेम दाखवू लागतात, तेव्हा खुशाल समजावे, यात त्याचा काहीतरी कावा असावा.

# जीवन चक्र – मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)



## जीवन की रोशनी

इस तरह हर मनुष्य अपना निवास स्थान स्वयं बनाता है। यहाँ ही नहीं बल्कि इससे आगे सूक्ष्म और मानसिक मण्डलों में भी जहाँ कि मनुष्य के आदि से लेकर विभिन्न जन्मों में इकट्ठे किये संस्कारों का भण्डार होता है ये सारे कारण शरीर में गुप्त शक्तियों के रूप में उपलब्ध रहते हैं और इनका एक भाग स्थूल जिस्म के बनने से पहले ही दोबारा जन्म लेते समय आकाशी सूक्ष्म शरीर बना लेता है।

इस तरह मृत्यु के समय विदा हो कर जा रही आत्मा अपने साथ, सम्पूर्ण जीवन के संस्कार और मुख्य भावनायें मन की तख्ती पर उभार कर साथ ले जाती है जो उस समय अपने चमकते रंगों में भिन्न नज़र आते हैं और ये आगे आत्माओं के सूक्ष्म और कारण संसार में इसके आने वाले लक्ष्य का निर्णय करते हैं। स्थूल लिबास के उतर जाने के पश्चात् हर आत्मा का वास्तविक सूक्ष्म व्यक्तित्व सफेद दिन की तरह दिखाई पड़ता है। हो सकता है यहाँ पर इस दुनिया में लोगों को जब तक चाहे शराफत के मखौटे और दिल को आकर्षित करने वाले लिबास पहनकर कुछ समय के लिए मनुष्य दूसरों को धोखा दे जाने में सफल हो जाये परन्तु सूक्ष्म दुनिया में किसी का दम्भ–पाखण्ड नहीं चलता । वहाँ इसे ठोस बाहरी खोल, माँस के बने वस्त्र से भी विहीन कर दिया जाता है।

कपड़ रूप सुहावणा छडि दुनियाँ अन्दरि जावणा ।। मन्दा चंगा आपणा आपे ही कीता पावणा ।। हुक्म कीये मनि भावदे राहि भीड़ै अगै जावणा ।। नंगा दोजख चालिया तां दिसै खरा डरावणा ।। करि अउगण पछोतावणा ।।

(पाउड़ी आसा जी की वार)

सूक्ष्म संसार उन आत्माओं का संसार है जो स्थूल शरीर उतार चुकी हैं और सूक्ष्म और कारण पर्दों में लिपटी होती हैं। इसे पितृलोक या मर चुके पूर्वजों का देश कहा जाता है। यहाँ आत्मा सात लोकों (मण्डलों) में से एक लोक की सामग्री को लेकर बने हुए, सात पर्दों के खोल में कैद होती है। यहाँ ईश्वरीय कोठाली में पड़कर और कुछ शुद्धि की प्रक्रियाओं में से निकल कर इनकी मैलों को जला दिया जाता है और देव लोक में रहने योग्य बनाया जाता है और स्थूल शरीर में आरंभ किये कार्यों में रही त्रुटियों और कमिओं के कारणों को दूर किया जाता है। मैडम बलावट्सकी की एक शिष्य श्रीमती ऐनीबैसैंट (१८४७–१९३३) ने अपनी प्रसिद्ध पुस्तक The ncient Wisdom में सूक्ष्म देश के एक उप लोक जिसे वह यमलोक कहती है, में स्थित कुछ उप लोका का प्रकट होता है, यह बड़ा सुन्दर चित्र खींचा है। जैसा कि इसके नाम ख्वाहिशों (इच्छाओं) का देश है जिसमें सात उपलोक कहे जाते हैं और इसमें से हर एक में भिन्न–भिन्न स्वभावों और भावनाओं वाले लोग रहते हैं।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग – २)

## अंतरीक बल

बच्चे जब वीडियो गेम खेलते हैं तो उन्हे भूख प्यास का अहसास नहीं रहता, उन्हे पता ही नहीं चलता कि कब दो घंटे बीत गये । ताश खेलने वालो को पता ही नहीं चलता कि दिन कैसे बीत गया। संगीत जब हम सुनते हैं तो समय थम जाता है। मन पसंद काम करते समय आप को समय का अहसास नहीं रहता। जब हमारे मन में सेवा भावना होती है तो समय का पता नहीं चलता। यही कारण है धार्मिक कार्यों में हमें थकावट नहीं होती। अपने सब से महत्वपूर्ण काम को दिलचस्प बनायें और दिलचस्प माने। अगर आपको अपने काम से नफरत है तो ऐसे में आप एक घंटा काम करके ही थक जायेंगे और सोचने लगेगें कि हुये आज नया कीर्तिमान बनाना चाहते हैं तो आप को यह दिलचस्प बाकी काम कल कर लेंगे। यदि आप अपने लक्ष्य को ध्यान में रखते लगेगा, जिस से आप में नई ऊर्जा का संचार होगा। कुछ दिलचस्प करें जिस में आप का मन लगे। यदि काम नीरस है और उसे दिलचस्प बनाने का कोई उपाय नहीं है तो किसी विशेषज्ञ से राय लें। यदि आप का सपना पर्याप्त शक्तिशाली है तो यह आपको आगे बढ़ने के लिये प्रेरित करता रहेगा। दूसरो को लगेगा आप दिन रात खाहमखाह मेहनत कर रहे हैं, जब कि आप को उनकी तरह मजे करने चाहिये, लेकिन आप को यह दिखेगा कि आप दिन रात मेहनत कर के अपने लक्ष्य की ओर बढ़ रहे है और वह समय जल्द आयेगा जब आप अपनी मनचाही मंजिल पर पहुंच जायेंगे और उसके बाद सारी जिंदगी मजे करेगें। जब हमारा गहरा योग होता है तब भी समय थम आता है। जब हमारे मन में कल्याण की भावना होती है तो समय थम जाता है इसलिए हर कार्य करते हुए किसी न किसी को मन से तरंगें देते रहो आप को समय का पता ही नहीं चलेगा। समय प्रबंधन और पार्किन्सन का नियम

मनुष्य के दिमाग में एक ऐसा सिसटम है, जो मनुष्य से अपने आप काम करवाता है। आपको बस किसी काम को करने की ठान लेना है कि फलानी तरीख तक मैं इसे कर लूंगा या हर रोज यह यह काम करूंगा। इसे पार्किन्सन का नियम कहते हैं। हम एक पार्टी देना चाहते हैं। पार्टी का दिन फिक्स कर दिया तो जैसे जैसे पार्टी नजदीक आती जायेगी हमारी काम करने की गति बढ़ जायेगी और आखिरी दो दिन में बहुत सारे काम निपटा देंगे। हमें सिर्फ सोचना है कि अमुक काम इस इस दिन इस समय तक करना है। सोचने के बाद अपने आप तैयारी में जुट जाते हैं। परीक्षा के दिनों में विद्यार्थी परीक्षा की तैयारी में जी जान से जुट जाते हैं जबकि सारे वर्ष बहुत ढीला पुरुषार्थ करते हैं।

कहीं जाने के लिए तारीख और समय निश्चित कर लेते हैं तो यात्रा से संबंधित सारी तैयारी आखिरी एक दिन में पूरे जोर–शोर से करते हैं। हम ५ दिन की तैयारी एक दिन में कर लेते हैं। एक क्रिकेट टीम ने ३०० रन बनाए तो दुसरी टीम के लिये लक्ष्य हो गया ३०१ रन प्राप्त करना। दुसरी टीम इसे प्राप्त करने के लिए जी जान से जुट जाती है और इसे बहुत जल्दी प्राप्त कर लेती है। यह सब पार्किन्सन के नियम के कारण होता है। दृढ़ विचार कि यह यह काम हम जरूर करेगें जब मन में आ जाता है तो हम सारे काम तीव्रता से निपटाने लगते हैं और उस दिन वह काम कर के बिल्कुल फ्री हो जाते हैं।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

**दुसरा महिना :** द्वितीये मासि घनः संपदयते पिण्डः पेश्यर्बुद वा ।– चरक शारीरस्थान (४–१०) दुसऱ्या महिन्यात गर्भ हा अधिक घन व्हायला सुरुवात होते. या महिन्यात मोठे अवयव, स्त्रोतसे (System) निर्माण होऊ लागतात; परंतु पूर्ण वाढ होत नाही. या महिन्यात आपण सोनोग्राफी केली असता बाळाचे हृदयाचे ठोके दिसतात. ज्यास आपण वार (Placenta) म्हणतो, ती पण निर्माण होते व त्यातून बाळाचे पोषण गर्भनाळेद्वारे वारेतून होते. गर्भ लांबी : १ इंच, गर्भ वजन – २ ग्रॅम. तिसरा महिना : या महिन्यात बाळाचे सर्व अवयव, इंद्रिये दिसायला लागतात. या महिन्यात दोन हात, दोन पाय, डोके असे गींचे पाच भाग दिसायला लागतात. या महिन्यात आपण आपल्या बाळाचे ठोके डॉप्लरने ऐकू शकतो. गर्भ वजन – १४ ग्रॅम असते.

चौथा महिना : या महिन्यामध्ये गर्भाचे सर्व अवयव तयार झालेले असतात. या महिन्यात बाळ त्याच्या हाता–पायांच्या साहाय्याने पोहण्याची कृती करतो. बाळाची त्वचा गुलाबी पारदर्शक असते. गर्भनाळ चांगल्या प्रकारे तयार होऊन त्यातून बाळाचे पोषण होते. बाळाची वार पूर्ण तयार होते. गर्भलांबी ६ ते ७ इंच, गर्भ वजन – १०० ग्रॅम.

पाचवा महिना : या महिन्यामध्ये सप्तधातूंपैकी मांस व रक्त या दोन धातूंची अधिक वाढ होते. तसेच या महिन्यात बाळाला बुद्धी प्राप्त होते; म्हणून या महिन्यात बाळाशी सुसंवाद, संगीत ऐकणे, ॐकार या गोष्टी कराव्यात. तसेच गर्भिणीला काही खाण्याची इच्छा झाल्यास त्या घरातील सदस्यांनी पूर्ण कराव्यात. कारण या महिन्यात गर्भवतीला अशक्तपणा जास्त जाणवतो; परंतु कुठल्याही गोष्टीचा अतिरेक असू नये.

## कर्करोग : स्त्रियांचा छुपा शत्रू

स्त्रियांना होणारा कर्करोग खरोखरच एका छुप्या शत्रूप्रमाणे आजार वाढवतो; कारण कुठल्याही कर्करोगाच्या सुरुवातीच्या अवस्थेत लक्षणे तीव्र स्वरुपात जाणवत नाहीत. अगदी हळूहळू शरीरात या व्याधीचा प्रसार होतो. त्यामुळे बरेचदा कर्करोग अंतिम अवस्थेत पोहोचतो त्या वेळेस त्याची लक्षणे दिसू लागतात. उपचाराला उशीर झाल्यामुळे रोगाचे समूळ उच्चाटन शक्य होत नाही. या अवस्थेतील रुग्णांचे औषधे, केमोथेरपी व रेडिओथेरपीच्या साहाय्याने फक्त आयुष्यमान वाढवता येते. एखादा शत्रू जसा मागून अचानक हल्ला करतो, तसाच कर्करोग छुप्या शत्रूप्रमाणे शरीरावर अचानक हल्ला करतो. याकरिताच स्त्रियांनी चाळीशीच्या दरम्यान वर्षातून एकदा स्त्रीरोग तज्ज्ञांकडून संपूर्ण शरीराची तपासणी करुन घेणे आवश्यक आहे. कारण पहिल्या अवस्थेमध्ये कर्करोगाचे निदान झाले तर लहान शस्त्रक्रियेने रोगाचे समूळ उच्चाटन करता येते.

शारीरिक संबंध झाल्यानंतर अंगावरुन रक्तस्त्राव होतो हे लक्षण एका रुग्ण महिलेने मला सांगितले. सोनोग्राफी, पॅपस्मिअर या तपासण्यांमधून तिला गर्भाशयमुखाचा कर्करोग असल्याचे निदान झाले. कर्करोग प्राथमिक अवस्थेमध्ये असल्याचे लक्षात आल्याने लगेचच गर्भाशय निर्हरण शस्त्रक्रिया केली व या रोगापासून तिची पूर्णपणे सुटका केली. या घटनेला सात वर्ष पूर्ण झाली. परंतु अजूनही तिला कुठलाही त्रास होत नाही.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# स्नेहालयात ९ नोव्हेंबरला वंचित घटकातील मुलांची दिवाळी होणार दीपोत्सवाने साजरी

**लायन्स क्लब अहमदनगर व लिओ क्लबचा उपक्रम; १ हजार मुलांचा राहणार समावेश; आर्थिक व विविध वस्तू स्वरूपात मदत करण्याचे आवाहन**

नगर – लायन्स क्लब अहमदनगर व लिओ क्लबच्या वतीने वंचितांच्या दिवाळीसाठी ९ नोव्हेंबर रोजी स्नेहालयात दीपोत्सव साजरा केला जाणार आहे. कार्यक्रमासाठी मराठी सिनेमा सृष्टीतील कलाकार उपस्थित राहणार आहेत. वंचितांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवून त्यांची दिवाळी गोड करण्याच्या उद्देशाने आर्थिक तसेच विविध वस्तू स्वरूपात मदत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे हे सोळावे वर्ष आहे.



या दीपोत्सव मेळाव्यात सहभागी होऊन वंचित घटकांना आनंद देण्यासाठी लायन्स क्लबच्या अध्यक्षा डॉ. अनघा पारगावकर, सचिव डॉ. सिमरनकौर वधवा, खजिनदार अंजली कुलकर्णी, लिओच्या अध्यक्षा रिधिमा गुंदेचा, प्रकल्प प्रमुख प्रशांत मुनोत, आनंद बोरा, सुनील छाजेड, समन्वयक हरजितसिंह वधवा, स्नेहालयाचे संचालक हनिफ शेख, कार्यक्रम समन्वयक महेश सूर्यवंशी नागरिकांना योगदान देण्याचे आवाहन केले आहे.

मागील सोळा वर्षांपासून लायन्स क्लबच्या माध्यमातून वंचित, अनाथ, दिव्यांग आणि निराधार मुलांची दिवाळी गोड होण्यासाठी दीपोत्सवाचे आयोजन केले जाते. यावर्षी स्नेहालयासोबतच शहरातील इतर वंचित मुलांसाठी देखील हा कार्यक्रम होणार आहे. या मेळाव्यात मुलांसाठी मेहंदी, टॅटू, घोडागाडी राईड, जम्पिंग पॅड, मेरी गो राऊंड अशा विविध खेळांचा समावेश असणार आहे. तसेच पॉपकॉर्न, बुढ्ढी के बाल आणि मिष्टान्न भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. मुलांचे मनोरंजन करण्यासाठी विविध कार्टून पात्रांची देखील उपस्थिती राहणार आहे. तसेच मुलांच्या मनोरंजनासाठी व्हिक्टर डान्स ॲकॅडमी, गिरिराज जाधव यांचा ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम रंगणार आहे. मुलांसाठी विशेष होम मिनिस्टरच्या धर्तीवर चाइल्ड मिनिस्टरचा कार्यक्रम होणार आहे.

स्नेहालयाच्या परिसरात पणत्या प्रज्वलित करुन संपूर्ण परिसर दिव्यांनी लखलखाटणार आहे. कार्यक्रमादरम्यान मुलांना चॉकलेट आणि विविध खाऊंचे वाटप केले जाणार आहे. तर सोडत पध्दतीने विद्यार्थ्यांना विविध भेट वस्तूंचे बक्षीसे दिली जाणार आहेत. उडन तस्तरी हा प्रयोग देखील मुलांसाठी विशेष आकर्षण ठरेल. दुपारी ३ वाजल्यापासून रात्री ८ वाजेपर्यंत कार्यक्रम रंगणार आहे.

दीपोत्सवाचे उद्घाटन प्रधान जिल्हा सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाप्रसंगी प्रांतपाल विजय सारडा, उप प्रांतपाल राजेश अगरवाल, रिजन चेअरमन आशिष बोरावके, डॉ. एस.एस. दीपक, शरद मुनोत, मोहन मानधना, लायन सचिन भट्टड, अशोक बोरा यांच्यासह प्रमुख पाहुण्यांची उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमाचा समारोप विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन आणि फराळ वाटप करून करण्यात येईल. मुलांसाठी किल्ला बनवा, भेटकार्ड बनवा आणि निबंध स्पर्धांचे देखील आयोजन करण्यात आले आहे.

वंचितांच्या दीपोत्सवासाठी तब्बल ५ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असून, या वर्षी मुलांना नवीन कपडे देण्याचा मानस आहे. आपली दिवाळी आनंदी करताना, वंचितांची दिवाळी गोड करण्यासाठी सर्वांनी या उपक्रमात सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यंदाच्या दीपोत्सवात एक हजारहून अधिक वंचित मुलांच्या सहभागाची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

लायन्स क्लब ऑफ अहमदनगरच्या वतीने या उपक्रमासाठी वस्तूरूपात तसेच आर्थिक मदत स्वीकारली जाणार आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अरविंद पारगावकर, धनंजय भंडारे, दिलीप कुलकर्णी, राजवीरसिंह संधू, अभय मेस्त्री, विजय कुलकर्णी, डॉ. अमित बडवे, डॉ. संजय असणानी, सुनील छाजेड, कमलेश भंडारी, सुमित लोढा, किरण भंडारी, संतोष माणकेश्वर, नितीन मुनोत, ऋषी सुकाळे, अर्पिता शिंगवी, अजित शिंगवी, प्रशांत गाडेकर, जस्मीत वधवा, आदींसह लायन्स व लिओ क्लबचे सदस्य परिश्रम घेत आहेत. अधिक माहितीसाठी डॉ. अनघा पारगावकर ९८५०८८५२९२, डॉ. सिमरनकौर वधवा ९४२२०८१७६१, अंजली कुलकर्णी ९४२२०८०६७६, प्रशांत मुनोत – ९४२२२२९६९९ यांना संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.




पंजाब नॅशनल बँकेच्या वतीने कार्पोरेट सामाजिक जबाबदारी उपक्रमांतर्गत येथील एमआयआरसीला रुग्णवाहिका देण्यात आली. (छाया – समीर मन्यार)

# पंजाब नॅशनल बँकेच्या वतीने एमआयआरसीला रुग्णवाहिका सुपूर्द

नगर – पंजाब नॅशनल बँकेच्या वतीने कार्पोरेट सामाजिक जबाबदारी उपक्रमांतर्गत येथील एमआयआरसीला रुग्णवाहिका देण्यात आली. या रुग्णवाहिकेची चावी मंडळ प्रमुख राकेशकुमार राठोड (नाशिक परिमंडळ, पंजाब नॅशनल बँक) यांनी कमांडंट ब्रिगेडियर रसेल डिसोझा (एमआयआरसी अहमदनगर) यांच्याकडे सुपूर्द केली.

याप्रसंगी उपमंडळ प्रमुख राकेश पवार (नाशिक परिमंडळ, पंजाब नॅशनल बँक), डेप्युटी कमांडंट कर्नल राजी मॅथ्यू (एमआयआरसी, अहमदनगर) उपस्थित होते. पंजाब नॅशनल बँकेने एमआयआरसी, अहमदनगरला कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी अंतर्गत रुग्णवाहिका दान केली. नुकताच एमआय रुम, अहमदनगर येथे हा छोटेखानी कार्यक्रम झाला.

यानिमित्ताने पंजाब नॅशनल बँकने आठवडाभर चालणारा विजिलेंस जनजागृती कार्यक्रमही सुरु केला. मंडळ प्रमुख राकेश कुमार राठोड यांनी सर्व भागधारकांना पारदर्शक वातावरण प्रदान करण्यासाठी पंजाब नॅशनल बँकेच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. जेणेकरुन भ्रष्टाचार दूर होईल.

पंजाब नॅशनल बँकेच्या दाळ मंडई शाखेने दिवंगत कुंवर सिंग यांच्या पत्नी हेमा देवी यांना ५० लाख रुपयांचा विमा दाव्याचा धनादेश सुपूर्द केला. कुंवर सिंग हे लष्करातील निवृत्ती वेतनधारक होते. ज्यांचा अपघाती मृत्यू झाला.

याप्रसंगी रविकुमार (मुख्य व्यवस्थापक, नाशिक सर्कल), निलेश कार्ले (शाखा प्रमुख, दाळमंडई शाखा), म्हस्कू खमगळ (सावेडी शाखाप्रमुख), सुयोग ब्राम्हणे (एमआयआरसी शाखाप्रमुख), लेफ्टनेंट कर्नल श्रीजीथ (लेखाधिकारी, एमआयआरसी) आदी उपस्थित होते.

# शहरासह उपनगरात १४ नोव्हेंबरपर्यंत मोफत नाडी परीक्षण व उपचार शिबीर

नगर – शहरासह उपनगरात जुनाट आजार व व्याधींवर उपचारासाठी मोफत नाडी परीक्षण करुन उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सद्गुरु मोरेदादा चॅरीटेबल हॉस्पिटलण्ड मेडिकल ट्रस्ट व अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ (त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक) यांच्या संयुक्त विद्यमाने चंद्रकांत दादासाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली ७ ते १४ नोव्हेंबर पर्यंत सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेच्या दरम्यान हे शिबिर होणार आहे. यामध्ये त्र्यंबकेश्वर येथील डॉ. गौरकर व



डॉ. पाटील रुग्णांची तपासणी करुन उपचार करणार असून, या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.

७ नोव्हेंबर रोजी नवनागापूर, ८ नोव्हेंबर रोजी सावेडी गणेश मंदिर, ९ नोव्हेंबर रोजी वृंदावन कॉलनी, १० नोव्हेंबर रोजी तपोवन रोड, ११ नोव्हेंबर रोजी भिंगार, १२ नोव्हेंबर रोजी सारसनगर, १३ नोव्हेंबर रोजी केडगाव शिवाजीनगर, १४ नोव्हेंबर रोजी बालाजी कॉलनी केडगाव) येथे शिबीर होणार आहे.

या शिबिराचा समारोप १४ नोव्हेंबर रोजी केडगाव येथील बालाजी कॉलनी येथे होणार आहे.

शिबिराच्या अधिक माहितीसाठी शिबिराचे जिल्हा प्रतिनिधी खेमनर ९५९५४०१५१५ यांना संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

# स्वराली जाधव यांच्या सुमधुर गायनाने रंगली दिवाळी पहाट

नगर – रोटरी क्लब ऑफ अहमदनगर आणि अवतार मेहर बाबा सेंटर अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी पहाट हा मराठी, हिंदी गाण्यांचा कार्यक्रम अवतार मेहेर बाबा सेंटर येथे आनंदात संपन्न झाला. सुप्रसिद्ध गायिका कु. स्वराली रमेश जाधव (ढवळपुरी ता. नगर) यांच्या गायनाने श्रोते मंत्रमुग्ध झाले.

स्वराली रमेश जाधव सध्या प्राध्यापक आर. एन. भनगडे (संगीत अलंकार) अ.नगर यांच्याकडे शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेत असून इ. दहावी मध्ये शिकत आहेत. ग्रामीण भागात राहत असूनही त्यांची संगीताची साधना वाखाणण्याजोगी आहे. त्यांनी आपल्या कार्यक्रमाची सुरुवात अलबेला सजन आयो या अहिर भैरव रागातील बंदिशिने केली.



रोटरी क्लब ऑफ अहमदनगर आणि अवतार मेहेरबाबा सेंटर आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रमात सुमधूर गीताने कु. स्वराली जाधव हीची रंगली गायन मैफिल.

त्यानंतर मी राधिका (भावगीत), हे सुरांनो चंद्र व्हा (नाट्यगीत), चलो मेहर दरबार (मेहेर भजन), सखी मंद झाल्या तारका (भावगीत), वही पलकों का (ग़ज़ल), फासले ऐसे भी होंगे (ग़ज़ल), माझे माहेर पंढरी (अभंग), ए मोहब्बत तेरे अंजाम पे (ग़ज़ल) इत्यादी वेगवेगळ्या गीत प्रकारांनी ही मैफिल सजली. या कार्यक्रमामध्ये प्रशांत थोरात यांनी तबल्याची श्री रमेश जाधव यांनी संवादिनीची तसेच सोहम लासुरकर यांनी मंजिरीची उत्कृष्ट साथ संगत दिली.

सर्व कलाकारांचे स्वागत रो. दिलीप कर्नावट, रो. जवाहर मुथा व मेहेर केंद्राचे वैभव जोशी यांनी केले. अवतार मेहेरबाबा ट्रस्टचे अध्यक्ष मेहरनाथ कलचुरी यांनी बेगम अख्तर यांनी गायलेल्या गझलचे महत्त्व विशद केले.

या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ अहमदनगरचे अध्यक्ष रो. नितीन थाडे त्याचप्रमाणे अवतार मेहेरबाबा सेंटरचे अध्यक्ष मेहरनाथ कलचुरी सर तसेच त्यांचा सर्व स्टाफ, तसेच प्रकाश शिंदे, प्रा. कल्याण मुरकुटे, महेश लेले, रोटरी क्लबचे सदस्य रो. निलेश वैकर, भावना वैकर, रो. सुरेश कांकरिया, सचिव रो. सुभाष गर्जे, रो. सुहास क्षीरसागर, रो. हर्षवर्धन सोनवणे तसेच मेहेर केंद्राचे श्रीमती सविता जोशी, नीलम जोशी, रो. पुरूषोत्तम जाधव, रो. अजय पवार, अमेरिकन पाहूणी कु. गुणीवर, मेहेर भक्त राहूल मुळे, संतोष पाटसकर, निलीमा औटी, सुधाकर आव्हाड, प्रियांका शंखे, मोहित संगमकर, दिपक थाडे, रो. मंजुषा थाडे, अमोल बासकर, रो. अभिजीत बोरा, ऋणानुबंध संस्थेचे अजित रोकडे तसेच नगर मधील अनेक रसिक श्रोते उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रुती मुळे यांनी अतिशय सुंदर पद्धतीने केले.

# शहरातील डॉक्टर कलाकारांनी सादर केलेली 'स्वर दीपावली पहाट' रंगली

**सूरमयी संगीत मैफलमध्ये रसिक श्रोते मंत्रमुग्ध, नव्या-जुन्या पिढीतील गाण्यांचे बहारदार सादरीकरण**

नगर – सप्तसूर फाउंडेशनच्या डॉक्टर कलाकारांनी सादर केलेली स्वर दीपावली पहाट अहिल्यानगरमध्ये रंगली होती. ही सूरमयी संगीत मैफिलीने दिवाळीचा गोडवा वाढवून कला रसिकांच्या मनात घर केले. यामध्ये पहाटेची गाणी, भूपाळ्या, भावगीत, भक्तीगीत, आजी कडून ऐकलेल्या ओव्या, समर गीत, नव्या-जुन्या पिढीतील गाण्यांचे बहारदार सादरीकरण करण्यात आले. या कलाविष्काराने रसिक भारावले.



नगरमध्ये आयोजित सूरमयी संगीत मैफलमध्ये सहभागी झालेले डॉक्टर, कलाकार, गायक व श्रोतेगण.

डॉक्टर असलेल्या कलाकार मंडळींचा कार्यक्रम नेहमीच कलारसिकांना वेगळं ऐकवून जातो. हा त्यांचा वेगळेपणा पुन्हा रसिक श्रोत्यांच्या प्रशंसेस पात्र ठरला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात डॉक्टर मंडळींनी सादर केलेल्या गाण्यांना प्रतिसाद दिला. वल्लभाचार्य, कबीर, मीराबाई, शाहीर राम जोशी, सुरेश भट, शांता शेळके यांनी लिहिलेल्या गाण्यांपासून ते गायक सुधीर फडके, लता मंगेशकर, आशा भोसले, हृदयनाथ मंगेशकर, जयराम शिलेदार, प्रसाद सावकार, किशोरी अमोणकर, कुमार गंधर्व, वसंतराव देशपांडे, मोहम्मद रफी, सुरेश वाडकर, शंकर महादेवन, श्रेया घोषाल, अजय गोगावले, आर्या आंबेकर या सर्व दिग्गज लोकांची गाणी गायिले. तर काही शास्त्रीय संगीतातील चीजांपर्यंत डॉक्टर मंडळींनी अगदी लीलया गाऊन सर्वांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमास रसिकांचा प्रतिसाद मिळाला.

मराठी व हिंदी गीतांचा कार्यक्रम उत्तरोत्तर अधिक रंगत गेला. रसिक श्रोत्यांनी उत्कृष्ट कार्यक्रमाबद्दल दिलेल्या प्रतिक्रिया बोलक्या होत्या. सर्व उच्चशिक्षित व आपल्या कामात व्यस्त असलेले, फक्त गाण्याच्या प्रेमापोटी एकत्र येऊन कलारसिकांसाठी करत असलेल्या कार्यक्रमाबद्दल उपस्थितांनी कौतुक व्यक्त केले.

स्वर दीपावली कार्यक्रमात नव्या जुन्या हिंदी-मराठी गाण्यांची जुगलबंदी रंगली होती. विं.दा. करंदीकर व रामदास फुटाणे यांच्या खुमासदार कविता सादर करून डॉ. अभिजीत पाठक यांनी उपस्थित श्रोत्यांना खिळवून ठेवले. लोकांना हसवून व कलासाधनेने आनंदी दीपावली कशी साजरी करावी याचे एक उत्तम उदाहरण या कार्यक्रमातून श्रोत्यांना मिळाले.

या कार्यक्रमात अहिल्यानगर मधील डॉक्टर असलेले कलाकार डॉ. विलास जोशी, डॉ. अभिजीत पाठक, डॉ. बाळासाहेब देवकर, डॉ. रोहिणी काळे, डॉ. स्मिता केतकर, डॉ. योगिनी वाळिंबे, सौ. पल्लवी जोशी, डॉ. नीरज करंदीकर, डॉ. ज्योती दीपक, डॉ. सत्तार सय्यद, डॉ. शैलजा निसळ, डॉ. गीता करंदीकर, डॉ. प्रकाश टेकवाणी, डॉ. सरोज भिडे, डॉ. शिरीष कुलकर्णी, डॉ. संगीता कुलकर्णी, डॉ. प्राची पाटील, डॉ. सीमा गोरे, डॉ. दीपा मोहोळे, डॉ. अविनाश वारे, डॉ. सचिन पानपाटील, डॉ. रेशमा चेडे, डॉ. दीप्ती करंदीकर, डॉ. प्रीती नाईक यांनी सहभाग नोंदवला.

याप्रसंगी गायन व संगीत क्षेत्रातील तज्ञ मंडळी देखील उपस्थित होते.

# एक दीप अत्याचारा विरोधात, कर्तृत्व गाजवणाऱ्या स्त्रियांसाठी

**भाऊबीजनिमित्त श्री एकदंत गणेश मंडळाचा दीपोत्सव**

नगर – सध्या स्त्रियांवर होणारे अत्याचार प्रचंड प्रमाणात वाढलेले आहे, अशा परिस्थितीत सुद्धा स्त्री निर्भयपणे उभी राहून या अत्याचारा विरोधात लढा देत आहे. तिच्यावर अत्याचार झाले तर ती दुर्गाचे रूप धारण करून अत्याचारा विरोधात आवाज उठवत आहे अशा या कर्तुतवान स्त्रियांसाठी श्री एकदंत गणेश मंडळाच्या वतीने भाऊबीज निमित्त एक दिवा या कर्तुत्ववान महिलांसाठी लावून हा दीप उत्सव साजरा करण्यात आला.




एकदंत गणेश मंडळाच्यावतीने करण्यात आलेला दीपोत्सव.

दातरंगे मळा येथील श्री एकदंत कॉलनीमध्ये दीपावली भाऊबीज निमित्त श्री एकदंत गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षी १११११ दीप लावून वेगवेगळे विषय घेऊन हा दीपोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. या वर्षी मंडळाने महिलांवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी व जागृतीसाठी आणि ज्या महिला अत्याचारा विरोधात कर्तृत्व बजावून आपले संरक्षण करून इतरांनाही जागृत करणाऱ्या व अन्यायाविरुद्ध लढा देणाऱ्या महिलांचा विषय घेऊन हा दीप उत्सव साजरा करण्यात आला.

यामध्ये मंडळांनी सुंदर अशी रांगोळीच्या माध्यमातून स्त्रियांवरील होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात स्त्री कठीण प्रसंगी दुर्गा देखील होते व ती अत्याचारी वृत्तीचा नाश करते, अशी संदेश देणारी भव्य रांगोळी काढून त्याभोवती विविध स्लोगन काढण्यात आले. त्यामध्ये वो धारा भी है... वो शिव की जटा भी है.... वो बहती गंगा भी है.... वो दुर्गा भी है..., इतिहास के पन्ने दुबारा नही दोहराएंगे.... हत्यार उठालो द्रोपदी, कान्हा नही आयेंगे..., लेहरा दिया आजादी वाला तिरंगा जिस रस्सीसे...अब उसी से न्याय भी दे दो.... असे जागृती पर घोषवाक्य रांगोळीच्या माध्यमातून रेखाटून त्या भोवती दीप उजळविण्यात आले. स्त्रियांवरील होणारे अत्याचार विरोधात लढणारे आंदोलनाचे अनेक छायाचित्र यावेळी लावण्यात आले.

यावेळी श्री एकदंत गणेश मंदिरात श्री गणेशाची महाआरती करून १११११ दीप प्रज्वलित करण्यात आले. या भाऊबीज दीपोत्सवाचे मंडळाचे हे १३ वे वर्ष असून प्रत्येक वर्षी मंडळाच्या माध्यमातून वेगवेगळे विषय घेऊन समाजात जागृतीचा संदेश देण्याचा प्रयत्न असतो. मागच्या वर्षी स्वराज्यासाठी ज्या मावळ्यांनी रक्ताची आहुती दिली अशा सर्व मावळ्यांसाठी आणि छत्रपती शिवाजी महाराजांसाठी दीपोत्सव साजरा करण्यात आला होता. दीपोत्सव पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांसह पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. मंडळ दरवर्षी दीपोत्सव वेगवेगळ्या विषय घेऊन साजरा करत असल्याने नागरिकांनी उत्सवाचे कौतुक केले. हा उत्सव यशस्वी करण्यासाठी श्री एकदंत गणेश मंडळाचे सर्व कार्यकर्ते आणि महिला मंडळाच्या सर्व महिलांनी परिश्रम घेतले.

# बेघर, निराधारांच्या अन्नदानामुळे आनंदाचा प्रकाश

**डॉ. उद्धव शिंदे यांचे प्रतिपादन; स्नेहबंधतर्फे मानवसेवा प्रकल्पात अन्नदान**

नगर – ज्यावेळी खऱ्या भुकेल्याला, निराधाराला, पिडीतांना कोणत्याही आमंत्रणाशिवाय दोन घास प्रेमाचे मिळेल ते खरे अन्नदान होय. समाजापासून दुरावलेल्या वंचितांना पुन्हा माणुस म्हणून समाजात उभं करणे प्रत्येकाची जबाबदारी आहे. मानवसेवा प्रकल्पातील बेघर, निराधार, मनोरुग्णांना आणि परिस्थितीमुळे संघर्षमय जीवन जगणाऱ्यांच्या जीवनात या अन्नदानामुळे आनंदाचा प्रकाश निर्माण करु शकलो, असे प्रतिपादन स्नेहबंधचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी केले.



मानवसेवा प्रकल्प येथे स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने अन्नदान करतांना स्नेहबंधचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, दिलीप गुंजाळ, अमोल बास्कर.

बेघर, निराधार, पिडीत मनोरुग्ण महिला व बंधूंच्या उपचार आणि पुनर्वसनासाठी कार्य करणाऱ्या श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळाच्या अरणगाव रोड येथील मानवसेवा प्रकल्पात स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने अन्नदान देण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळाचे सचिव दिलीप गुंजाळ, अमोल बास्कर आदी उपस्थित होते.

डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, मानवसेवा प्रकल्पात ज्यांना समाजाने नाकारलं, हेटाळलं त्या निराधार पिडीत मानसिक विकलांगांना आधार देण्याचे कार्य माहोत आहे. या मानवसेवेच्या कार्यात सर्वांनी हातभार लावण्याची गरज आहे.

आजकाल एक नवीन संस्कृती पुढे येत आहे. सण, समारंभ किंवा निवडणुकीच्या काळात शामियाने उभारून जेवणावळी दिली जाते. त्यालाच काही लोक अन्नदान असे म्हणतात. पण या अन्नदान कार्यक्रमात किती बेघर, अन्नापासून वंचित असणारे लोक जेवतात याचाही आपण विचार केला पाहिजे.

या जेवणावळीत बहुतेक करुन आपले नातेवाईक आप्तेष्ठ व मित्र परिवारच असतो. याला आपण फारतर नव्या संकल्पनेनुसार गेट टुगेदर असे म्हणता येईल.

# शहरात मुलांनी साकारली राजगड किल्ल्याची प्रतिकृती

### धर्मवीर संभाजीराजे प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांचा उपक्रम, किल्ल्यावर उभा केला शिवकालीन इतिहास


नगर शहरातील गाडळकर मळा येथे धर्मवीर संभाजीराजे प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची साकारलेली रायगड किल्ल्याची प्रतिकृती छायाचित्रात दिसत आहे.

नगर – दिवाळी आणि किल्ले हे मुलांचे समीकरणच बनलेले असताना, शहरातील गाडळकर मळा येथे धर्मवीर संभाजीराजे प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याची पहिली राजधानी असलेल्या राजगड किल्ल्याची प्रतिकृती साकारली आहे. या किल्ल्याची हुबेहुब प्रतिकृती साकारुन शिवकालीन इतिहास रेखाटण्यात आला असून, किल्ला पाहणाऱ्यांना शिवकालीन राजगडावर आल्याचा भास होत आहे.

१२ बाय १५ फुटाचा किल्ला मुलांनी शिवकालीन इतिहासाचा सुक्ष्मपणे अभ्यास करुन बनवला आहे. ६० ते ७० पोते माती, दगड व विटांचा वापर करुन हा किल्ला बनविण्यात आला आहे. किल्ला बनविण्यासाठी तीन दिवस कार्यकर्ते अहोरात्र झटत होते. बुरुज, मावळे, राजगडाचे तीन दरवाजे व किल्ल्यामागे वसलेले गाव राजगडाचा इतिहास जिवंत करत आहेत. या किल्ल्यात महाद्वार, मध्यभागी बालेकिल्ला, चोरवाट, हत्ती खडक, चिलखत बुरुज, पद्मावती तलाव, मंदिर व बारूद कोठार आदी विविध गोष्टींचा समावेश आहे.

प्रतिष्ठानचे मार्गदर्शक दत्ता गाडळकर व अध्यक्ष सिद्धेश झावरे यांच्या मार्गदर्शनाखाली किल्ला बनविण्यात आला आहे. यामध्ये तन्मय गोबरे, श्रेयस कांडेकर, सर्वेश गाडळकर, संस्कार दाऊभट, आर्यन एकाडे, पृथ्वी सुपेकर, दर्शन पाटील, राजवीर गाडळकर, अर्णव एकाडे, शंभू गायकवाड, स्वराज घोलप, ओम भोजने, आरव गाडळकर, सिद्धेश झावरे, ओम देवकर, अमय राखुंडे, सुजल रसाळ, यश गारुडकर, तेजस गोबरे, शंतानू गाडळकर, सुजित लालगे, दिग्विजय मांडगे यांनी किल्ला बनविण्यासाठी परिश्रम घेतले.

दत्ता गाडळकर म्हणाले की, आजच्या पिढीला आपल्या पूर्वजांचा इतिहास ज्ञात होण्यासाठी राजगड किल्ला उभारण्यात आला आहे. मुलांनी देखील मोठ्या उत्साहात अभ्यासपूर्ण पध्दतीने किल्ला साकारला आहे. किल्ला बनविताना छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण करण्यासाठी घेतलेले कष्ट व प्रचंड मेहनत याची देखील जाणीव किल्ला उभारताना झाली. मोबाईलमध्ये अडकलेल्या मुलांना मैदानाकडे घेऊन जाण्यासाठी आपल्या पारंपारिक खेळाची आवड निर्माण करावी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर साकारण्यात आलेल्या राजगड किल्ल्याचा वैभव पाहण्यासाठी परिसरातील अबालवृध्दांसह नागरिक गर्दी करत आहे.

# मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त 'कौमी एकता सप्ताहात' व्याख्यानमाला व विविध स्पर्धा



नगर – मखदुम एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी व मराठा सेवा संघाच्यावतीने स्वतंत्रता सेनानी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त कौमी एकता सप्ताहाचे ९ ते १५ नोव्हेंबर पर्यंत आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मख़दुम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान व मराठा सेवा संघाचे महानगर अध्यक्ष इंजि. अभिजीत एकनाथ वाघ यांनी दिली.

या सप्ताहाचा शुभारंभ ९ नोव्हेंबर रोजी रात्री ९ वाजता डॉ. अल्लामा इकबाल यांच्या जयंती राष्ट्रीय उर्दु दिनी अलकलम अकॅडमी लखनौच्या संयुक्त विद्यमाने महफिले मुशायरा ने होणार आहे.

११ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता अहमदनगर च्या भुईकोट किल्ल्यात नेताकक्ष मध्ये स्वतंत्रता सेनानी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांना अभिवादन केले जाणार आहे. १२ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता मुकुंदनगर येथील मौलाना आझाद हायस्कुल मध्ये प्रा. डॉ. महेबुब सय्यद यांचे पहिले व्याख्यान होईल.

तर दुसरे पुष्प प्रा.डॉ.अब्दुस सलाम सर हे १३ नोव्हेंबर रोजी आलमगीर येथील मातोश्री उर्दू हायस्कूल येथे सकाळी १० वाजता गुंफतील. शेवटचे व्याख्यान १४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता माणिक चौक येथील चाँद सुलताना हायस्कूल येथे प्रा.डॉ.महेबुब सय्यद यांच्या व्याख्यानाने होणार आहे.

तसेच या सप्ताहामध्ये चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, या सर्व स्पर्धा शहरातील विविध शाळेत घेण्यात येणार आहेत. या स्पर्धा ४ थी ते ६ वी, ७ वी ते ९ वी व १० वी ते १२ वी या तीन गटात होणार आहे. या व्यतिरिक्त अलकरम हॉस्पिटलतर्फे विविध आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. अशी माहिती मख़दुम सोसायटीच्या सचिव डॉ. कमर सुरुर यांनी दिली.

या सप्ताहातील विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी व व्याख्यानमालेचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मौलाना आझाद महोत्सव समितीचे अध्यक्ष सय्यद खलील व सचिव निसार बागवान यांनी केले आहे.

# 'स्नेहसमर्थ वर्गमित्रांचा' २२ वर्षांनी रंगणार मेळावा

### श्री समर्थ विद्यामंदिर, सावेडीच्या २००२ बॅचचे गेट–टुगेदर

नगर – तब्बल २२ वर्षांनी शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी व आपल्या बालपणातील मित्र–मैत्रिणींना भेटण्यासाठी अतुर असलेल्या २००२ बॅचच्या श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेच्या वर्ग मित्रांचा स्नेह मेळावा ९ नोव्हेंबर रोजी समर्थ विद्यामंदिर येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

समर्थ रत्न
२००२

शाळेतील व विशेषतः बालपणातील मित्र–मैत्रिणींच्या व शाळेच्या जुन्या आठवणी जपण्यासाठी व त्यांना उजाळा देण्यासाठी २००२ चे वर्गमित्र जमत आहेत.

याप्रसंगी श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेच्या सर्व शिक्षकांचा सन्मान देखील करण्यात येणार आहे. त्यानंतर स्नेहभोजन आयोजित करण्यात आलेले आहे. यानंतर मित्र–मैत्रिणींच्या अनौपचारिक गप्पागोष्टी तसेच विविध कला गुणदर्शन होणार आहे. हा मैत्रीचा सोहळा अविस्मरणीय होण्यासाठी विविध गेम्सचे आयोजन केले आहे तसेच सेल्फी पॉईंट उभारण्यात आला आहे. या वर्गमित्र स्नेह मेळाव्यामध्ये १५० विद्यार्थी सहभागी होतील तसेच ३० पेक्षा जास्त शिक्षक याप्रसंगी मार्गदर्शन करतील.

या स्नेह मेळाव्यासाठी विशेषतः परदेशातून वर्गमित्र–मैत्रीणी उपस्थित राहणार आहेत. इंजिनिअर, डॉक्टर, विविध व्यावसायिक, आयटी क्षेत्रातील इंजिनियर अशा सर्व क्षेत्रातील वर्गमित्र– मैत्रीण यासाठी आवर्जून उपस्थित राहणार आहेत.

२२ वर्षाच्या दीर्घ कालावधीनंतर होणाऱ्या या वर्गमित्र स्नेह मेळावा अविस्मरणीय होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न आयोजकांतर्फे करण्यात आलेले आहे असे आयोजन समितीचे सदस्य शंतनु देशमुख व डॉ. सुदर्शन गोरे यांनी सांगितले.

# नगर–कल्याण रोडवरील होलसेल फटाका मार्केटमधील लकी ड्रॉ सोडत



दिवाळीनिमित्त नगर–कल्याण रोडवरील होलसेल फटाका मार्केटमध्ये लकी ड्रॉ ची सोडत काढण्यात आली.

नगर – दिवाळी सणानिमित्त नगर–कल्याण रोडवर अहमदनगर फटाका व्यापारी असोसिएशनचे वतीने जिल्ह्यातील होलसेल फटाका विक्री मार्केटमधील लकी ड्रॉ सोडत फटाका असोसिएशनच्या सर्व पदाधीकाऱ्या मार्फत करण्यात आली. या वेळी फटाका असोसिएशनचे अध्यक्ष गजेंद्र राशीनकर, सचिव श्रीनिवास बोज्ञा, उपाध्यक्ष सुरेश जाधव व गणेश परभणे, सहसचिव अरविंद साठे, कोषध्यक्ष शिवराम भगत आदींसह इतर सदस्य उपस्थित होते.

लकी ड्रॉ मधील असोसिएशन च्या वतीने ठेवण्यात आलेले पहिले बक्षीस इलेक्ट्रिक बाईक वांबोरी येथील अशोक पुंड यांना तर दुसरे बक्षीस ५ ग्रॅम गोल्ड क्वाईन निफाड येथील चेतन बोरा यांना, तिसरे बक्षीस नंदनवन फटाका मार्टच्या वतीने ५० ग्रॅम चांदीचे क्वाईन अहिल्यानगर येथील सर्वेश सब्बन यांना, चौथे बक्षीस अमोल तोडकर फटाका व क्षीरसागर फटाका यांचे मार्फत फ्रिज घोसपुरी येथील सरफ्रराज शेख यांना, पाचवे बक्षीस टकले फटाका मार्फत वॉटर क्युरिफायर शनिशिंगणापूर येथील ऋषिकेश गुणवंत यांना, सहावे बक्षीस मल्हार फटाका यांचे वतीने ओव्हन भिंगार येथील दिपा सातपुते यांना मिळाले, सातवे बक्षीस चंगडे यांचे मार्फत ऐल ई डी टी व्ही माळीवाडा येथील लक्ष्मी माता मंदिर यांना, आठवे बक्षीस निखिल परभणे यांच्या मार्फत पाच इंडेक्शन ज्ञानेश हरिचंद्रे, राहुरी, लक्ष्मीकांत नलला, श्रमिकनगर, सुनीता ठोंबरे, निर्मलनगर, प्रवीण घोरपडे, बैजू भाभूळगाव, ताहेर खान, माळीवाडा यांना मिळाले, नववे बक्षीस महाराज फटाका मार्फत ५ मिक्सर निलेश शिंदे, गुंजाळवाडी, वेदांत शिनगारे, निर्मलनगर, पूजा सत्रे, गोवर्धन, पारनेर, आदित्य जाधव कळंब यांना मिळाले. दहावे बक्षीस अवतार फटाका मार्फत स्मार्ट फोन यशराज पागुळे, रतडगाव यांना प्राप्त झाले, अकरावे बक्षीस अरविंद फटाका मार्फत ट्रॅव्हलिंग बॅग मुबारक हसन सय्यद, निर्मलनगर यांना प्राप्त झाले. बारावे बक्षीस पटवेकर फटाका मार्फत ५ पैठणी किरण उमाप, पुणे, पगडचंद्र भगवान, समतानगर कल्याण रोड, धनाजी कुंभार, वाकड पुणे, पंकज पालवे, मेहेकरी, विभा सत्रे, अहिल्यानगर यांना मिळाले तेरावे बक्षीस श्री विशाल फटाका मार्फत ५ सिलिंग फॅन शैलेंद्र भागवत, शेरकर गल्ली, योगेश साव, पोलीस कॉलोनी, रुपेश सांगळे, पारनेर, गिते राहुल, विळदघाट, मनीषा म्हस्के, विळदघाट यांना मिळाले चौदावे बक्षीस लक्ष्मी फटाका बोज्ञा ब्रदर्स यांच्या मार्फत पाच इस्तरी नीलम जाधव, कळंब, संदीप बोरुडे, विनायक नगर, संदीप यादव, बोरुडे मळा, आदेश वाळके, दरेवाडी, अंजली नाबगे, गांधीनगर बोल्हेगाव यांना मिळाले. या लकी ड्रॉ साठी मेट्रिक्स जिम चे संचालक स्वप्नील पर्वते यांनी सहकार्य केले.

या वेळी फटाका मार्केट साठी लाईट पुरवठा करणारे प्रताप भोजणे, पटवेकर डेकोरेटर्सचे विकास पटवेकर, सिक्युरिटीचे उंडे सर यांचा सन्मान केला. तामिळनाडू येथील सुप्रीम फायर वर्क्सचे प्रतिनिधी कार्तिक यांचा ही सन्मान करण्यात आले. या वेळी फटाका असोसिएशनचे माजी उपाध्यक्ष व भिंगार अर्बन बँकेचे जेष्ठ संचालक कैलास खरपुडे यांची अहमदनगर जिल्हा पतसंस्था फेडरेशन वर तज्ञ संचालकपदी निवड झाल्याबद्दल विशेष सन्मान करण्यात आला. या वेळी असोसिएशन चे सर्व पदाधिकाऱ्यांचे ही सन्मान करण्यात आले. सन्मान शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आले.

स्वागत सुरेश जाधव यांनी केले. श्रीनिवास बोज्ञा यांनी प्रास्ताविक केले. अरविंद साठे यांनी आभार मानले. यावेळी जेष्ठ सदस्य देवीदास ढवळे, माजी उपाध्यक्ष कैलास खरपूडे, सुनील गांधी, निखिल परभणे, संजय सुराणा, अमोल तोडकर, दाजी गारकर, संभाजी कराळे, विकास पटवेकर, विजय मुनोत, अनिल टकले, सागर हरबा, उबेद खान, अविनाश जिंदम तसेच फटाका ग्राहक उपस्थित होते.

# शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फौंडेशन आयोजित स्पर्धेचा बुद्धिबळ पटावर चाल देऊन शुभारंभ


शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फौंडेशन आयोजित बुद्धिबळ स्पर्धेचे पटावर चाल देऊन शुभारंभ करताना रविंद्र चिपळूणकर व संघटनेचे सचिव यशवंत बापट. समवेत उपस्थित खेळाडू.

नगर – जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने होत असलेल्या बुद्धिबळ स्पर्धेचे उद्‌घाटन सेंट्रल बँक ऑफ इंडिया अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट हेड व राज्यस्तरीय बास्केटबॉल खेळाडू रविंद्र चिपळूणकर व जिल्हा बुध्दीबळ संघटनेचे सचिव यशवंत बापट सर यांनी बुद्धिबळ पटावर चाल देऊन उद्‌घाटन केले. या स्पर्धेत महाराष्ट्र सह मध्यप्रदेश, ओरिसा, गुजरात, हरियाणा, पश्चिम बंगाल, गोवा, दिव दमण, कर्नाटक, आंध्रप्रदेश, उत्तर प्रदेश एकुण २६५ खेळाडू सहभागी झाले आहेत. या स्पर्धेत १३५ खेळाडू आंतरराष्ट्रीय मानांकित खेळाडू सहभागी झाले असून ६ वर्षांपासून ते ८१ वयापर्यंत खेळाडू सहभागी आहेत.

स्पर्धेचे प्रास्ताविक व स्वागत सचिव यशवंत बापट सर यांनी सांगितले की ही स्पर्धा संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या सहकार्यातून व पुढाकाराने ही स्पर्धा होत आहे. दरवर्षी शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फौंडेशनच्यावतीने ३ स्पर्धा घेतल्या जातात. बक्षिसे, आकर्षक ट्रॉफी देऊन खेळाडूंना प्रोत्साहन दिले जात आहे. खेळाडूंना विविध सोयीसुविधा जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

प्रमुख पाहुणे रविंद्र चिपळूणकर म्हणाले की एवढी मोठी स्पर्धा पाहून मला बुद्धिबळ हा खेळ जिल्ह्यातील विविध भागात पोहचला आहे. याचा मला सार्थ अभिमान आहे. अनेक राज्यातील खेळाडू नगरमध्ये खेळायला येत आहे निश्चित नगरचे नाव बुद्धिबळाच्या खेळामुळे देशात पोहचले आहे ही विशेष बाब आहे. खेळाडूंनी खेळाचा आनंद घेऊन आपला उत्कृष्ट खेळ पणाला लावावा. या खेळात वयाचे बंधन नसून आपल्या खेळातील उत्कृष्ट चालीला महत्त्वाचे आहे. बुद्धिबळ खेळात खेळाडूंना आपला सराव जास्तीत जास्त करुन आपण खेळात आपल्या देशाचे नाव उज्वल करावे. उत्कृष्ट आयोजनाबद्दल मी अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे मनापासून कौतुक करतो.

स्पर्धेत पंच म्हणून शार्दुल तापसे सातारा, पवन राठी पुणे, अमरिश जोशी, विलास राजपूत छत्रपती संभाजीनगर, देवेंद्र ढोकळे, रोहित आडकर, सौ. अनुराधा बापट, सौ. रोहिणी आडकर काम पहात आहे.

स्पर्धा यशस्वीतेसाठी सचिव यशवंत बापट सर, खजिनदार सुबोध ठोंबरे, विश्वस्त पारुनाथ ढोकळे सर, शाम कांबळे, प्रकाश गुजराथी सर, सुनील गुगळे, सुनील जोशी, विष्णू कुद्रे, संजय खडके, चेतन कड, मनिष जसवानी, नवनित कोठारी, दत्ता घाडगे, स्वप्नील भगुरकर आदी परिश्रम घेत आहेत.

या स्पर्धेत विक्रमादित्य कुलकर्णी, श्रेयस मुजुमदार, श्रीराज भोसले, इंद्रजित महिंदरकर, आशिष चौधरी, ओम लमखणे, श्वान आशिर्वाद, धृव पाटील हे नामांकित खेळाडू आपले या स्पर्धेत उत्कृष्ट खेळ दाखविणार आहेत. ही स्पर्धा ६ ते १० नोव्हेंबर या कालावधीत सप्तक सदन मंगल कार्यालय खिस्त गल्ली येथे होत असून ९ राऊंड होणार असून रोज २ राऊंड खेळले जाणार आहेत.

स्पर्धा उद्‌घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वस्त पारुनाथ ढोकळे सर व आभार खजिनदार सुबोध ठोंबरे यांनी केले.

# योग विद्या धामतर्फे महिलांसाठी ११ नोव्हेंबरपासून 'मासिक पाळी दोष निवारण योग वर्गा'चे आयोजन

नगर – अनियमित मासिक पाळी, पाळीच्या काळात वेगवेगळे होणारे त्रास यापासून मुक्ती मिळण्यासाठी योग विद्या धामच्यावतीने महिलांसाठी मासिक पाळी दोष निवारण योग वर्ग ११ नोव्हेंबर पासून घेतला जाणार आहे, अशी माहिती योग विद्या धामचे अध्यक्ष डॉ. सुंदर गोरे यांनी दिली.

अनियमित मासिक पाळी येणे, पाळीच्या काळात ओटीपोटात तीव्र वेदना होणे, वजन वाढवणे, पाढदुखी व पायदुखीचा त्रास होणे. यावर वेगवेगळे औषधोपचार केले तरी उपाय झाला नाही अशा परिस्थितीत योगाभ्यासाच्या सहाय्याने सर्व तक्रारी हमखास दूर केल्या जातात. यासाठी मासिक पाळी दोष निवारण योग वर्ग येथील योग भवन, भिस्तबाग रोड येथे सकाळी व सायंकाळी घेतले जाणार आहे. तरी याचा जास्तीत जास्त मुर्लीनी व महिलांनी फायदा घ्यावा.

याबरोबरच नियमित योग वर्ग आणि शंख प्रक्षालन वर्ग देखील ११ नोव्हेंबर पासून सुरु होणार आहेत. या संबंधीच्या अधिक माहितीसाठी भ्रमण ध्वनी नं ९४०३१०९३२९ यावर संपर्क साधावा, असे आवाहन कार्याध्यक्ष सुभाष पांढरे यांनी केले आहे.



भाऊबिजेनिमित्त ज्ञानरचना सोशल फौंडेशनने बेघर मनोरुग्णांसाठी राबविलेल्या सुरमई संगीताच्या दीपसंध्येत रंगलेले कलाकार. दुसऱ्या छायाचित्रात हिंदी–मराठी गितांचे सादरीकरण करताना ऋतिक बैरागी तसेच न्यायाधीश विनोद डोंगरे आदी कलाकार.



## किल्ले बनवा स्पर्धेत गौरव वाबळे प्रथम

श्रीगोंदा – विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा व त्यांच्यात सृजनशिलता निर्माण व्हावी या हेतूने मढेवडगाव येथील जि. प. उंडेमळा शाळेत प्रदुषण मुक्त दिवाळी साजरी करण्यात आली. दिवाळी सणानिमित्त गोरखराजे उंडे यांच्या सौजन्याने किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. प्रथम क्रमांकाची 'रायगड' किल्ला प्रतिकृती गौरव प्रदीप वाबळे इ. १ ली / गौरी प्रदीप वाबळे इ. ४ थी यांनी बनवली. त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तसेच द्वितीय क्रमांक शौर्य महेश शिंदे, भरत शिंदे इ. १ ली / रुद्र महेश शिंदे इ. ३ री व तृतीय क्रमांक वसुंधरा मनोहर उंडे व अथर्व हेमंत उंडे इ. ४ थी व उत्तेजनार्थ वीर दिलीप पवार इ. १ ली, शंभूराजे मोहन गायकवाड इ. २ री व जीवन दिपक पवार इ. ३ री यांनी पटकावला.

# मानवसेवेत रंगली सुरमई संगीताची दीपसंध्या

### भाऊबीजनिमित्त ज्ञानरचना सोशल फाऊंडेशनचा बेघर मनोरुग्णांसाठी उपक्रम

नगर – रस्त्यावर फिरणाऱ्या बेघर, मनोरुग्णांसाठी आधार असलेल्या मानवसेवा प्रकल्पात सूरमयी संगीताची दीपसंध्या रंगली होती. गायन आणि वादनाच्या जुगलबंदीचा उपस्थितांनी आनंद लुटला. कल्याण–ठाणे येथील ज्ञानरचना सोशल फाऊंडेशनच्या वतीने भाऊबीजनिमित्त बेघर, मनोरुग्णांना मानसिक आधार देण्यासाठी व त्यांची भाऊबीज गोड करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दीपसंध्या संगीत मैफिलीचे उद्घाटन कवियत्री सरोज आल्हाट व ज्ञानरचना फाऊंडेशनच्या संचालिका सारिका शेलार यांच्या हस्ते झाले. फाऊंडेशनच्या संचालिका सुप्रिया चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा न्यायाधीश विनोद डोंगरे, जिल्हा ग्राहक मंचाचे न्यायाधीश चारुताई डोंगरे, पोस्टल संघटनेचे कार्याध्यक्ष संतोष यादव, मेहेर ब्लेस्ड संजीवन वेल्फेअर फाऊंडेशनचे अध्यक्ष महेश पवार, अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळाचे सचिव दिलीप गुंजाळ, अनिल हिवाळे, महेश कुलकुटके, डॉ. राजेंद्र पवार आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात ज्ञानरचना सोशल फाऊंडेशनच्या संचालिका सारिका शेलार यांनी समाजातील मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या आणि वंचित घटकांची दिवाळी व भाऊबीज गोड व्हावी याकरिता ज्ञानरचना सोशल फाउंडेशनने उपक्रम राबविल्याचे स्पष्ट केले.

यमन रागावर आधारीत श्री गणेश वंदनने या दीपसंध्येला प्रारंभ झाले. कलावंत प्रतिष्ठानचे ऋतिक बैरागी, अक्षय गव्हाणे, सौरभ साठे, सोहम लासुरकर, सुवर्ण प्रताप, सागर वाघमारे यांनी एकापेक्षा एक सरस हिंदी–मराठी गीतांचे सादरीकरण केले. या कलावंताबरोबरच न्यायाधीश विनोद डोंगरे यांनी गोड तुझे रुप, गोड तुझे नाव...., तर न्यायाधीश चारुताई डोंगरे यांनी खेळ मांडियेला हे भक्तीगीत सादर केले. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना दाद दिली.

प्रथम तुला वंदितो..., अवघे गरजे पंढरपुर चालला नामाचा गजर..., कानडा राजा पंढरीचा... ऐसी लागी लगन मीरा हो गई मगन..., हाल क्या है दिल का ना पूछो सनम..., तेरी दिवाणी..., श्रीराम जानकी बैठे है मेरे सीने मे... आदी हिंदी–मराठी गीतांसह भक्ती गीतांनी सायंकाळ सूरमयी बनली होती.

सुप्रिया चौधरी म्हणाल्या की, ज्ञानरचना सोशल फाऊंडेशन मानव सेवा प्रकल्पात मागील दोन वर्षापासून भाऊबीज साजरी करत आहे. या पुढील काळातही मनोरुग्णांच्या आरोग्यासाठी व त्यांना भावनिक आधार देण्यासाठी उपक्रम राबविला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण साळवे यांनी केले. आभार दिलीप गुंजाळ यांनी मानले.

## 'सिद्धार्थ वाणी'

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी म.सा. आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।



### "आराधना"

'जप' ही एक पद्धतीला स्मरणीय नामजप म्हणतात. ध्यानात नामजप करण्याची ही पद्धत आहे. चालताना माणूस प्रत्येक क्षणी नामजप करतो. नऊ लाख नमस्कार महामंत्राचा जप पूर्ण करण्यासाठी ही पद्धत योग्य आहे. याअंतर्गत स्मरणात नामजप चालू राहतो. शुभ नाम घेतल्याने वाईट कर्मापासून मुक्ती मिळते यामुळे वचनाचे पुण्य प्राप्त होते आणि शेवटी वचन पूर्ण होते. याला नामजपाची पद्धत म्हणता येईल. व्यक्ती हसते, त्याच्यासोबत बसलेले इतर लोकही हसतात. त्याचप्रमाणे एखाद्या व्यक्तीला जप करताना पाहून इतर लोक सुद्धा जप करतात. जप केल्याने माणसाच्या जीवनात परिवर्तन घडून येते. हे चैतन्यात प्रवेश करतात. आर्थिक संसाधने आणि आरोग्य प्राप्त होते. ही सामूहिक वातावरण सुधारण्याची देखील एक पद्धत आहे. ज्या शहरात किंवा परिसरात अखंड नामस्मरण केले जाते, तिथे निसर्गाचे स्वरूप बदलते. शहरात राहणाऱ्या कुटुंबांमध्ये परस्पर प्रेम वाढतो.

* **नामजपाची आणखी एक** पद्धत आहे. ज्याला जाणीवपूर्वक नामजप म्हणतात. ही जाणीवपूर्वक नामस्मरणाची प्राचीन पद्धत आहे. धरणेन्द्र पदमावतीच्या पूर्वीच्या अवतारात पार्श्वनाथ प्रभूंनी सर्प जोडप्याला महामंत्राची आठवण करून दिली. प्राणी असूनही त्यांना जिनवरचा मार्ग अवलंबला. यामध्ये मन बदलण्याची गरज नाही. जाणीव बदलली पाहिजे

* **ॐ ओमचे** प्रारंभिक अक्षर पुरेसे आहे. सांसारिक जीवनात दीर्घकाळ ध्यानासाठी वेळ मिळत नाही. ज्याप्रमाणे दगही मंथनाने लोणी मिळते. त्याचप्रमाणे मनाचे मंथन केल्याने शक्तीची उन्नती होते. पूर्वीच्या काळी मंदिराची स्थापना झाली. तेव्हा त्यात कास, पितळी घंटा होती असे व्हायचे. कांस्य धातूमध्ये एक अंगठी असते. तो गुंजन ह्रदयात प्रवेश करतो अशी परिस्थिती येते. जेव्हा एक ताल तयार होतो, गांभीर्याला गती आहे. तो शांतपणे वाहतो, पण त्याचा प्रवाह दिसत नाही. तसेच मंत्र हे एक असे फायदेशीर साधन आहे. जे आत्म्याचे देवात रुपांतर करते. सर्पाचा धरणेन्द्रदेव आणि पदमावती देवी झाले. मंत्र म्हणजे स्वतःमध्ये हरवून जाण्याचे नाव, अध्यात्माच्या जवळ जाण्याची ही मुख्य पायरी आहे. मंत्र आत्म्याला उन्नत करते आणि अध्यात्माने रंगते. प्रत्येकाला तपश्चर्या करता येत नाही. सामान्य माणूसही नामजप करू शकतो. सामान्याकडून असाधारणेत परिवर्तन करण्याचे हे सूत्र आहे. जेव्हा दगड बोटीत ठेवला जातो तेव्हा तो सर्वात मोठ्या समुद्रातसुद्धा बुडत नाही. तसेच आत्मा जेव्हा मंत्राचा जापाचा आश्रय घेते तेव्हा तोही निघून जातो, मंत्राची पूजा करणारे लोकजीवनात सुख, समाधी आणि शांती अनुभवतात.

– सौ. सविता चोरडिया

# मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी मतदार जागृती मोहीम राबवा

### जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या सूचना

नगर – लोकसभा निवडणुकीत कमी मतदान झालेल्या मतदान केंद्रांवर मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी लोकसहभागातून मतदार जागृती मोहीम राबवावी आणि जिल्ह्यात ७५ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान होण्यासाठी एकत्रित प्रयत्न करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिल्या.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकप्रसंगी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ, नगरपालिका प्रशासन अधिकारी प्रशांत खांडकेकर आदी उपस्थित होते.

श्री.सालीमठ म्हणाले, मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, रांगेत उभे राहायला सावलीची व्यवस्था, प्रतीक्षा कक्ष, सायंकाळी प्रकाश व्यवस्था, रॅम्प, मतदान कक्षात प्रकाश व्यवस्था, आरोग्य सुविधा, पाळणाघर, व्हीलचेअर आदी किमान सुविधा कराव्यात. मतदारांसाठी आवश्यक सुविधा देऊन त्यांना मतदानासाठी प्रोत्साहित करावे. दोन किंवा अधिक मतदान केंद्र एकच ठिकाणी असल्यास स्वयंसेवकांची नियुक्ती करावी आणि परिसरात सूचना फलक लावण्यात यावे. मतदान केंद्रावर मतदार सुलभपणे पोहोचेल अशी व्यवस्था असावी.

मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्याकरिता जिल्हा प्रशासनातर्फे ई प्रतिज्ञापत्राचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. उपक्रमात सहभागासाठी संकेतस्थळाच्या माध्यमातून मतदान करणार असल्याचे ई – प्रतिज्ञापत्र भरायचे आहे. या उपक्रमासाठी लिंक मिळाल्यानंतर अधिकाधिक व्यक्ती मतदान करण्याचे ई – प्रतिज्ञापत्र भरतील असे प्रयत्न करावेत. प्रतिज्ञापत्र संकेतस्थळावर सादर करणाऱ्यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने ई प्रमाणपत्र देण्यात येईल.

महिला बचत गट, आरोग्य सेविका, अंगणवाडी सेविका यांच्या मदतीने मतदार जागृती मोहीम आखण्यात यावी. ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान झालेल्या केंद्राच्या परिसरात गृहभेटीद्वारे मतदारांच्या समस्या जाणून घ्याव्यात. अराजकीय सामाजिक आणि सेवाभावी संस्था, व्यक्तींची मदत घेण्यात यावी. सर्व उपक्रम प्रभावीपणे राबवावेत, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

श्री.येरेकर म्हणाले, ग्रामसेवकांनी ग्रामीण भागातील मतदान केंद्रावर भेट देऊन किमान आवश्यक सुविधेची माहिती घ्यावी. स्वीप उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांना मतदानाचे आवाहन करावे. यासाठी विविध स्पर्धा आणि उपक्रमांचे आयोजन करा. स्थानिकस्तरावर नावीन्यपूर्ण उपक्रम राबवावेत. मतदानाच्या दिवशी दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रावर आणण्यासाठी सुविधा द्याव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या.

यावेळी स्वीप समन्वयक कडुस यांनी मतदार जागृती उपक्रमांची माहिती दिली. कमी मतदान झालेल्या शेवटच्या १० टक्के मतदान केंद्रांवर आणि ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान झालेल्या केंद्रांवर विशेष लक्ष द्यावे. ८ नोव्हेंबर रोजी मतदार शपथद्वारे या मोहिमेचा शुभारंभ करावा. पथनाट्य, रांगोळी स्पर्धा, विविध स्पर्धा, मानवी साखळी, पालकांकडून संकल्प पत्र भरून घेणे, लोकशाही दौड, उद्योगातील कामगारांना प्रोत्साहित करण्यासाठी उपक्रम, सेल्फी पॉइंट, सायकल रॅली, गृहभेटीद्वारे मतदारांना मार्गदर्शन आदी उपक्रम राबवावेत, असे आवाहन त्यांनी केले.

बैठकीला तहसीलदार, गटविकास अधिकारी, नगरपालिकांचे मुख्याधिकारी, आरोग्य अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक आदी दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# २४ तास जनतेसाठी उपलब्ध असलेले संग्राम जगताप यांचा विजय निश्चित

### तृतीयपंथींचे जिल्हाध्यक्ष काजल गुरु

नगर – शहरातील तृतीय पंथी समाजासाठी स्मशानभूमीचा प्रश्न बऱ्याच वर्षांपासून प्रलंबित होता.यासाठी गेल्या २५ वर्षांपासून माही पाठपुरावा करत होतो. मात्र न्याय मिळाला नाही. पण आ. संग्राम जगताप यांनी एका मागणीत स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे शहरातील तृतीय पंथ्यांच्या स्मशानभूमीचा महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागला आहे. त्यांनी यासाठी केवळ सात दिवसात अडीच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. पुढील काळात तृतीय पंथ्यांसाठी घरकुल योजना ही राबवण्यात येण्याचे आश्वासन आमदार जगताप यांनी दिले आहे. सर्व समाजांना सहकार्य करणारे व सर्वांचे प्रश्न सोडवणारे आमदार जगताप सर्वसामान्य नागरिकांसाठी २४ तास उपलब्ध असणारे आमदार जगताप यांचा विजय निश्चित असून भविष्यात ते मंत्रीही होतील, असे आशीर्वाद तृतीय पंथी समाजाचे जिल्हाध्यक्ष काजल गुरु यांनी यांनी आमदार जगताप यांना देऊन सर्व लाडक्या बहिणींप्रमाणे तृतीयपंथी बहिणींनाही लाडकी बहीण योजना सुरू करावी यासाठी आमदार जगताप यांनी विधानसभेमध्ये प्रश्न उपस्थित करावा, अशी मागणी काजल गुरु यांनी केली.



महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप यांनी तारकपूर भगत प्रचारफेरीत पंजाबी, शीख व सिंधी नागरिकांशी संवाद साधला.

महायुतीचे उमेदवार आमदार संग्राम जगताप यांनी प्रचारार्थ बुधवारी सायंकाळी प्रभाग क्रमांक चार तारकपूर, प्रकाशपुर परिसरात फेरी काढण्यात आली. यावेळी माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर, अमोल गाडे, ठाकूर नवलानी, जितू गंभीर, जयकुमार रंगलानी, जनक अहुजा, लकी खूपचंदाणी, कैलास नवलानी, बल्लू सचदेव, जितू सदवाणी, सुरेश हिरानंदानी, चिंटू गंभीर, रॉबिन साळवे, भाजपाचे दामोदर बठेजा, हॅपी कुकरेजा, हरजितसिंग वधवा आदींसह परिसरातील सिंधी, पंजाबी व शीख समाजचे नागरिक उपस्थित होते.

यावेळी हरजीतसिंग वधवा म्हणाले, नगर शहराच्या जडणघडणीमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून जगताप कुटुंबीय महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. नगरमध्ये आमदार जगताप यांनी मोठ्या प्रमाणात विकास कामे केली आहे. यामध्ये आयटी पार्क पुनर्जीवित करणे, नगरच्या नव्या एमआयडीसीसाठी सहाशे एकरची जागा उपलब्ध करून देणे, तारकपूर भागात सर्व अंतर्गत रस्ते सिमेंट कॉंक्रीटचे झाली आहेत. शहरातील अल्पसंख्यांक सिंधी पंजाबी समाजाचे अनेक प्रश्न त्यांनी सोडवले आहेत. त्यामुळे शहरातील पंजाबी सिंधी समाज कायम त्यांच्या पाठीशी उभे आहे.

यावेळी अमोल गाडे यांनी आ.सांगणारं जगताप यांच्या प्रयत्नातून प्रभाग चार मध्ये झालेल्या विकास कामासानही माहिती दिली. प्रभाग चार मध्ये ६० कोटींची विकास कामे झाली आहेत. प्रभागातील सर्व अंतर्गत रस्त्यांची कामे मार्गी लागली आहेत. सिंधी समाजाच्या सांस्कृतिक भावनासाठी आ.जगताप यांनी जागा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे या भागातील नागरिक आ.संग्राम जगताप यांच्या पाठीशी उभे आहेत.

# एसएससी परीक्षेसाठी प्रविष्ठ विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ

मुंबई – इयत्ता १० वी परीक्षेसाठी प्रविष्ठ असणाऱ्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया सध्या सुरु आहे. फॉर्म भरण्यासाठी अंतिम मुदत ५ नोव्हेंबर देण्यात आली होती. मात्र वेबसाईटवर येणाऱ्या तांत्रिक अडचणी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आलेल्या निवडणुक ड्यूटी आणि प्रशिक्षण तसेच दिवाळी सुट्ट्या लक्षात घेता ५ नोव्हेंबर ही फॉर्म भरण्याची मुदत पर्याप्त होणार नसल्याने विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ द्यावी, अशी मागणी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळ, पुणे तसेच सर्व विभागीय मंडळाचे अध्यक्ष व सचिव यांच्याकडे करण्यात आली होती. या मागणीची दखल घेत १९ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती शिक्षक भारती संघटनेचे राज्य सचिव सुनील गाडगे यांनी दिली.

साधारण २६ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर या कालावधीत सर्व विद्यार्थी आणि शिक्षक शिक्षकेतर कर्मचार्यांना दिवाळी सणानिमित्त सुट्टी आहे. काही शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी दिवाळी सणानिमित्त आपल्या मूळगावी जातील. तरी दिवाळीच्या सुट्ट्या संपल्यानंतर म्हणजेच १२ नोव्हेंबर नंतर पुढील किमान ७ दिवसांपर्यंत (२० नोव्हेंबर पर्यंत) इयत्ता १० वी फॉर्म भरण्यासाठी मुदतवाढ मिळावी अशी मागणी सुनील गाडगे, जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, अहमदनगर महिला जिल्हाध्यक्षा सौ. आशा मगर, जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब लोंढे, कैलास जाधव, जिल्हासचिव विजय कराळे, उर्दू जिल्हाध्यक्ष मोहंमद समी शेख, उच्च माध्यमिकचे जिल्हाध्यक्ष रामराव काळे, जिल्हा सचिव महेश पाडेकर, कार्याध्यक्ष किशोर डोंगरे, संभाजी पवार, कार्यवाह संजय भुसारी, हनुमंत रायकर, नवनाथ घोरपडे, सिकंदर शेख, संजय पवार, संतोष देशमुख, किसन सोनवणे, सोमनाथ बोंतले, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, जॉन सोनवणे, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, सचिव विभावरी रोकडे, कार्याध्यक्ष मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर, विनाअनुदानितच्या राज्यअध्यक्षा रूपाली कुरूमकर आदींनी करून या मागणीसाठी विशेष पाठपुरावा केल्यामुळेच या मागणीला यश आले आणि एसएससी परीक्षेसाठी प्रविष्ठ विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ मिळाली.

# ४५ वर्षे जागा लोकोपयोगासाठी आणली नसल्यामुळे सावेडी बस स्थानक येथे १९ नोव्हेंबरला ढब्बू लोकमकात्या सूर्यनामा

नगर – लोकभक्ती, ज्ञानभक्ती आणि कर्मभक्तीला तिलांजली वाहिल्यामुळे नगर शहरासह जिल्ह्यातील लोकशाही म्हणजे वेड्या बाभळीची शेती ठरली असल्याचा आरोप पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने करण्यात आला आहे. ४५ वर्षे लोक उपयोगासाठी जागा आणली नसल्यामुळे सावेडी बस स्थानकाच्या जागेवर संघटनेच्या वतीने १० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता ढब्बू लोकमकात्या सूर्यनामा केला जाणार असल्याचे संघटनेच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे.

गेल्या अडीच दशकांमध्ये नगरच्या लोकप्रतिनिधींनी सत्ता, संपत्ती आणि फ्लेक्स वरील बडेजावला प्राधान्य दिले. त्यामुळे शहरातील सावेडी बस स्थानक येथील कोट्यावधी रुपयांची साडेआठ एकर जागा आज पर्यंत पडून आहे. अकरा एकर जमिन १९८० साली एसटी महामंडळाने संपादित करून ताब्यात घेतली. त्यापैकी अडीच एकर जमीन डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाला देण्यात आली, परंतु उरलेली साडेआठ एकर जमीन गेली ४४ वर्षे लोक उपयोगासाठी वापरली गेली नाही. त्यावर कचराकुंडीचे राज्य असून, नगर हे महानगर मध्ये रूपांतरित झाले अशा वेळेस या साडेआठ एकरांच्या जमिनीवर जागतिक दर्जाचे अत्याधुनिक बस स्थानक करण्यासाठी आजपर्यंत कोणत्याही लोकप्रतिनिधीने प्रयत्न केला नाही. त्यामुळे नगरच्या मागच्या दोन पिढ्यांचे नुकसान झाले. याच कारणांसाठी डब्बू लोकमकात्या सूर्यनामा संघटनांच्या वतीने घोषित करण्यात आला आहे.

एसटी महामंडळ हे नोकरशाही चालवीत असलेला पांढराहत्ती झालेला आहे. लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधी सरकार आणि सरकारी महामंडळावर लक्ष ठेवत नसेल, तर त्यातून जनतेच्या हिताचा बट्ट्याबोळ होतो, याची प्रचिती सावेडीच्या बस स्थानकावरुन दिसून येते. त्यामुळे यंदाच्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी फुगड्या, रांगोळी, मेहंदी अशा फुटकल गोष्टींच्या नादी न लागता शिवाजी महाराजांचा वारसा चालविणाऱ्या लोकभक्ती, ज्ञानभक्ती व कर्मभक्ती असलेल्या लोकप्रतिनिधींची निवड करावी आणि लोक डिच्चू कावा आणि लोक डिच्चू फत्ते या महामंत्राचा अवलंब करावा, यासाठी हा सूर्यनामा जारी करण्यात आला आहे. एसटी महामंडळाच्या सगळ्या बसेस खटारा आणि धुळीने माखलेल्या आहेत. संपूर्ण एसटी महामंडळ टक्केवारीच्या खावडीने ग्रासले आहे. एसटी महामंडळ दिवाळखोरीमध्ये ढब्बू लोकमकात्यांनी नेल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सत्तापेंढाऱ्यांनी कोट्यवधीरुपयांची माया निर्माण करून गुन्हेगाराच्या खाजगी फौजा स्थापन केल्या आहेत. ही बाब स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांचा अवमान करणारी आहे. सावेडी बस स्थानकाच्या जागेवर कोट्यावधी रुपयाचे अत्याधुनिक महानगर सेंट्रल बस स्थानक करण्यासाठी यावेळी संघटनांच्या वतीने सूर्य साक्षी भूमिपूजन करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. सावेडी बस स्थानक येथील ढब्बू लोकमकात्या सूर्यनाम्यासाठी ॲड. कारभारी गवळी, वीर बहादूर प्रजापती, अशोक सब्बन, शाहीर कान्हू सुंबे, जयेष देवळालीकर, डॉ. महेबूब शेख, केशव बरकते, रईस शेख, जसवंतसिंग परदेशी, बबलू खोसला, अशोक भोसले, राम धोत्रे, अशोक औशीकर, कैलास पठारे, सुधीर भद्रे, विठ्ठल सुरम, प्रशांत शिंदे, पोपटराव साठे, सुरेश पापडेजा, अल्ताफ शेख, एम.ए. इकबाल, सुनिल टाक आदी प्रयत्नशील आहेत.

# जम्मू विद्यापीठात संघमार्गदर्शक म्हणून प्रा. बाळासाहेब शेळके यांची निवड

श्रीरामपूर – भारतीय विद्यापीठ संघटना, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने विविध राज्यांतील विद्यापीठांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या आंतर विद्यापीठ तलवारबाजीच्या (मुले) स्पर्धा जम्मू विद्यापीठ येथे आयोजित करण्यात येत आहेत. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघाचे संघ मार्गदर्शक म्हणून येथील सी.डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स मधील क्रीडा शिक्षक प्रा. बाळासाहेब शेळके यांची नियुक्ती विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ यांनी केलेली आहे.



या स्पर्धा ३ ते १२ नोव्हेंबर दरम्यान जम्मू विद्यापीठ येथे होत आहेत. त्याबद्दल त्यांचे महाविद्यालय विकास समितीच्या चेअरमन व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर, उपप्राचार्य डॉ. सादिक सय्यद, शारीरिक शिक्षण संचालक प्रा.सुभाष देशमुख, वाणिज्य विभागप्रमुख प्रा.अनिकेत खत्री, एन.सी.सी. विभागप्रमुख प्रा.विजय नागपुरे, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ.संतोष घंगाळे, पर्यवेक्षक विजय दळवी, अधिक्षक सोमनाथ पथवे, क्रीडा शिक्षक सुनिल बनसोडे, सर्व शिक्षक व शिक्षेकतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.




राळेगणच्या श्रीराम विद्यालयात एस.एस.सी. २००८ च्या बॅचच्या विद्यार्थी मेळाव्याप्रसंगी तत्कालिन शिक्षक–शिक्षिका. समवेत माजी विद्यार्थी–विद्यार्थिनी.

# राळेगणच्या श्रीराम विद्यालयात स्नेहमेळावा उत्साहात

नगर – राळेगण येथील श्रीराम विद्यालयात एस.एस.सी. २००८ च्या बॅचचा विद्यार्थी स्नेहमेळावा उत्साहात साजरा झाला.

दररोज घाई गडबडीत जगणे विसरलेले मित्र–मैत्रिणी पुन्हा १६ वर्षांनी पुन्हा तीच शाळेची घंटा ऐकली, पुन्हा वर्गात शिक्षकांनी छडी घेतली, गुरुजनांचा आशिर्वाद घेतला.

सर्वांनी सोबत जेवणाचा आनंद घेतला. गुरुजनांचा सन्मान यावेळी करण्यात आला. शिक्षक पांडुरंग गोरे यांचा वाढदिवस सर्वांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका तारका भापकर या होत्या. कार्यक्रमास संस्था इन्स्पेक्टर पांडुरंग गोरे, अर्जुन भांगे, रावसाहेब साबळे, प्रदीप काळे, विजय जाधव, राजेंद्र कोतकर, कैलास गुंड, किसन माने, साहेबराव येणारे, कादर सय्यद, करीम शेख, बाळासाहेब घुले, बाळासाहेब फलके, आकांक्षा शेलार हे शिक्षक उपस्थित होते.

सूत्रसंचालन प्रसाद दुरेकर यांनी तर नाना खोटे व काशिनाथ खोटे यांनी अध्यक्षीय निवड, गणेश भापकर यांनी अनुमोदन, ज्ञानेश्वर हराळ, रवींद्र कुलांगे, राणी पिंपळे, स्मिता कोळेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मेळाव्यात सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिक्षिका तारका भापकर यांनी अध्यक्षीय भाषण केले. केराबाई भापकर यांनी सर्वांचे आभार मानले.

# कामरगाव मारहाणप्रकरणी खोटा गुन्हा दाखल केला

### सखोल चौकशीची महिलेची पोलिस अधिक्षकांकडे मागणी

नगर – कामरगाव येथे २ नोव्हेंबर रोजी घडलेल्या मारहाणीच्या घटनेत आम्हा पती पत्नीला मारहाण करून आमच्यावरच खोटा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ज्यांचा या भांडणाशी कुठलाही संबंध नाही त्यांची ही नावे या गुन्ह्यात गोवली गेली असून पोलिसांनी या घटनेचा सखोल तपास करून आम्हाला न्याय द्यावा अशी मागणी सविता शरद कातोरे (रा. कामरगाव, ता.नगर) यांनी जिल्हा पोलिस अधिक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात त्यांनी म्हंटले आहे की, शनिवारी (दि.२) सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास बबन नामदेव कातोरे, शोभा बबन कातोरे, करण बबन कातोरे, रंजित बबन कातोरे (सर्व रा. कामरगाव, ता.नगर) यांनी मला व पती ला मारहाण केली आणि पोलिसांकडे आमच्या विरोधात खोटी फिर्याद दिली आहे. आपला मुलगा श्रवण शरद कातोरे हा पुणे येथे शिक्षण घेत असून तो घटनेच्या दिवशी सकाळीच पुणे येथे गेलेला आहे. त्याच्या होस्टेल वरील सीसीटीव्ही कॅमेरे तपासणी करण्यासाठी उपलब्ध आहेत.

तर अनिता विजय लाळगे ही घटनेच्या दिवशी अंबरनाथ (मुंबई) येथे नातेवाईकांकडे गेलेली होती. तसेच विजय लाळगे, राजेंद्र लाळगे व सुनिता लाळगे हे फक्त तेथे उभे होते. त्यांचा भांडणाशी कुठलाही संबंध नसताना त्यांची नावे गुन्ह्यात गोवली आहेत. घटनेच्या दिवशी आम्हा पती पत्नीला मारहाण केल्या नंतर बबन नामदेव कातोरे याने आता तुझ्या मुलावर खोटी केस करून त्याचे करिअर बरबाद करतो अशी धमकी ही दिली होती. त्यामुळे या घटनेचा गांभीर्याने तपास करत आमच्या मुलावर व इतरांवर दाखल केलेल्या गुन्ह्यात न्यायालयात आरोपपत्र सादर करताना खरी वस्तुस्थिती मांडण्यात येवून आम्हाला न्याय द्यावा अशी मागणी सविता कातोरे यांनी पोलिस अधिक्षकांकडे केली आहे.

